# श्रीकृष्ण



श्रीकृष्ण ह्या नावाची मोहिनी हजारो वर्ष भारतीय मनावर आहे. भारतीय समाज असे कोणतेही अंग नाही की ज्यावर श्री कृष्णाच्या व्यक्तिमत्वाचा परिणाम झाला नाही. हिदुधर्माचे तत्वज्ञान सांगणाऱ्या श्रीकृष्णाचा प्रभाव फक्त धार्मिक विषया पुरता मर्यादित नाही. तर साहित्य, काव्य, शिल्पकला, नृत्य, नाट्य, संगीत या सर्वामधून त्याची वेगवेगळी रुप चित्रीत करण्यात आली आहेत. ह्या सर्वामधून श्रीकृष्णांच्या चमत्कारंचा, कृष्णलीलांचा, आणि कृष्णनीतिचाच आधिक बोलबाला झाला आहे. तसेच श्रीकृष्णाच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंत त्याला सर्वांनी चमत्कारांच्या आंगड्या टोपड्या खालीच गुरफटून टाकला. त्यामुळे त्याला देवत्वातून मुक्त करुन मानवी रुपात आकळता आले नाही. श्रीकृष्णाच्या जीवनात कोणत्याही ठिकाणी नावे ठेवायला जागा नाही. भारतीय समाजाने त्याला सर्व दृष्टीने पूर्णावतार मानले आहे. असे असताना देखील भारतीयांनीच श्रीकृष्णाच्या व्यक्तिरेखेचे चमत्कारीक विडंबन केलेले आहे. लोकनाट्य, तमाशा, चित्रपट अथवा तत्सम प्रकारात श्रीकृष्णाशिवाय दुसऱ्या कोणत्याच पात्रांचा वापर विडंबनासाठी केला जात नाही व अशा व्यंगासाठी गोकुळातील श्रीकृष्णाच्या बाललीलांचाच अधिक तर वापर करण्यात आला आहे. ज्या ज्या गोष्टी सर्व सामान्य माणसाला करता येणे शक्य नाही. अशा सर्व गोष्टी श्रीकृष्णाच्या माथी निर्दयपणे लादून साहित्यकारांनी तर्काला न पटणाऱ्या गोष्टीच्या पुटासह त्याला वेगवेळ्या ढंगात सादर करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामध्ये काहींनी त्याला गोकुळात रासलीला खेळणारा व हवा तसा धुडगूस घालणारा नटखट श्रीकृष्ण म्हणून रंगविला, तर काहींनी त्याला चमत्कार करणारा म्हणून पत्करला, तर काहींनी त्याला तत्वज्ञ असा सादर केला.

श्रीकृष्ण ही व्यक्तिरेखा न मानता संकल्पना मानली तर ती अधिक आकलनीय ठरते अथवा ठरु शकते. ही संकल्पना सामाजिक, कौटुंबिक, राजकीय, इ. संदर्भानी मर्यादित झालेली नाही. ती मुक्तच नव्हे तर ती 'विमुक्त' आहे. जन्मदाता, जन्मगाव, बालपण, तारुण्य, राज्य-राजवर या बाबतीत श्रीकृष्णाचा एक ठिकाणा नाही. तरीही त्याच्या व्यक्तीत्वात एकरुपता-एकात्मता आहे. साऱ्या समष्टीला प्रभावात घेण्याचे सामर्थ्य या व्यक्तिरेखेत आहे. म्हणून 'दुर्गाभागवत' 'श्रीकृष्णास' 'पूर्णपुरुष' न म्हणता 'पूर्णरूप' म्हणतात.

आजपर्यंत अनेक साहित्यिकांनी अनेक पौराणिक व्यक्तिरेखा साहित्यात आणल्या. रामायण, महाभारत या महाकाव्यातील आणि आख्यानकाव्यातील अनेक व्यक्तिरेखा साहित्याचा विषय झाल्या

आहेत. त्यातल्या विष्णू अवतारातील राम आणि श्रीकृष्णाच्या व्यक्तिरेखेने साहित्यिकांना व वाचकांना अधिक मोहात टाकले आहे. स्वत:चा वंश, नातेसंबंध, गुरु व मित्रपरिवार आणि आयोध्येचे राज्य या मर्यादा बिंदुच्या वर्तुळात रामाच्या व्यक्तिरेखेने वेगवेगळी आव्हाने पेललेली दिसतात. त्या मानाने श्रीकृष्णाची व्यक्तिरेखा बालपणापासूनच गोकुळ, मथुरा, व्दारका इ. स्थळांशी संबंधीत होती. त्याच बरोबर तारुण्यात हस्तिनापूर, इंद्रप्रस्थाचे नायकत्वही त्याच्याकडे आले. श्रीकृष्णा शिवाय महाभारतातील साऱ्या व्यक्तिरेखा सामान्य मानव आहेत. विकारवश आहेत. मात्र महाभारतामध्ये श्रीकृष्णाने जी आव्हाने यशस्वीपणे पूर्ण केली. त्यातूनच त्याची मानत्वाची उंची वाढते. परंतु ही मानत्वाची चौकट श्रीकृष्ण जन्मताच बंदीशाळेततून वसुदेवाबरोबर बाहेर पडतो तेंव्हाच मोडून पडते आणि त्याला अद्‌भुतता आणि चमत्कारंची पुट चढतात आणि त्याला देवत्व प्राप्त होते.

या देवत्वा सहीत व्यासांनी श्रीकृष्णाला महाभारतात आणले. असे म्हणण्यापेक्षा महाभारतात 'सत्यमेव जयते' करण्यासाठी व्यासांनी 'श्रीकृष्णदेव' आणले. असे म्हणावे लागेल. श्रीकृष्ण ही व्यक्तिरेखा अद्‌भुतता व चमत्कार घेऊनच महाभारतात वावरते. अर्थात अनेक व्यक्ती वैशिष्ट्या पैकीच तीचे हे वैशिष्ट्य आहे. या वैशिष्ट्याला दूर सारुन त्यातील संभवनीय मानवत्व चित्रित करण्याचा अपूर्व प्रयत्न विसानयुगाच्या शिगेला पोहचलेल्या शतकाच्या अंताच्या लक्षणीय वळणावर उभा राहून केला आहे. हा प्रयत्न तर्कदृष्ट नाही पण पूर्णत: तर्कनिष्ठही म्हणता येत नाही. लेखकाच्या स्वभावनिष्ठ भावनाप्रधान, श्रध्दाळू, वैशिष्ट्यानुसार श्रीकृष्णाची व्यक्तिरेखा चित्रित करताना ती 'तर्कसृष्ट' झाली आहे असे म्हणता येते. कारण श्रीकृष्णचरित्रातील शक्य तितके चमत्कार कठोरपणे टाळून त्याच्या जीवनकार्याचा 'वास्तव वेध घेण्याचा'[७८] शिवाजी सावंतांनी घेतलेला वसा अपवाद वगळता खूपसा यशस्वी झाला आहे. त्यामुळे एक गुणसंपन्न व्यक्ती म्हणून श्रीकृष्ण वाचकांच्या समोर उभा राहतो.

अशा या गुणसंपन्न श्रीकृष्णाला आपल्या आगळ्या वेगळ्या गुणवैशिष्ट्यांसह शिवाजी सावंत यांनी 'युगंधर' या कादंबरीत चित्रीत केले आहे. तरी श्रीकृष्णाच्या 'युगंधर' रुपाचा यथाशक्ती यथामती वेध घेण्याचा हा प्रयत्न आहे.

## १) कुटूंबवत्सल, वर्धनशील, संस्कारशील युगपुरुष–

श्रीकृष्ण या शब्दाचा साधा उच्चार केला तरी ऐकणाराच्या मनामध्ये रासलीला करणारा, दह्या दुधाची चोरी करणारी, गोपींना अडविणारा, राजकारणी, कंसाचा वध करणारा व कुरुक्षेत्रावर गीता गाणारा तत्वज्ञ अशा अर्थाची अनेक वलय तयार होतात. आजपर्यंतच्या साहित्यिकांनी प्रवचनकारांनी, व्याख्यात्यांनी त्याच्या ह्या गुणांच्या वर्णनातच धन्यता मानली. अभ्यासकांनी मात्र त्याला आजपर्यंत झालेल्या थोर विभुती मधील एक पूर्ण पूरुष मानला आहे. दुर्गा भागवत तर श्रीकृष्णाला 'पूर्णरुप' मानतात. परंतु पूर्ण पुरुषामध्ये जे विविध गुण असतात. की ज्या गुणामुळे तो पूर्ण पुरुष ठरतो. त्या गुणांच्याकडे मात्र अभ्यासकांनी दुर्लक्ष केले आहे. त्याच्या ह्या दुर्लक्षीत गुणामधीलच एक महत्वपूर्ण गुण म्हणजे तो कुटूंबवत्सल, संस्कारशील युगपुरुष होता.

कुटूंब म्हणजे माणसाच्या आयुष्याच्या प्रारंभीच ज्ञान देणार विद्यापीठच असते. या विद्यापीठात कोण ज्ञान देतो म्हणून शिकवीत नाही तर कुटूंबातील प्रत्येक व्यक्तिच्या स्वभावातून त्याच्या बऱ्या वाईट गुणांचा परिणाम कुटूंबाच्या वर्तुळात होत असतो. त्यातूनच एखाद्या बालकाच्या व्यक्तिमत्वाची घडण होत असते. श्रीकृष्ण देखील अशाच एका संस्कारशील कुटूंबात वाढलेला होता. श्रीकृष्ण त्याच्या आयुष्यात दोन माता, दोन पिता तसेच तीन भगिनी, बलरामासारखा बंधू, शिवाय आठ चुलते व तेवढ्याच चुलत्या होत्या. गोकुळात गोपनायक नंदाच्या वाड्यात वाढणाऱ्या श्रीकृष्णाला सख्खी यशोदामाता आणि सावत्र रोहिणीमात होती. तसेच सुनंद, उपनंद, महानंद, नंदन, कुलनंदन, बंधुनंद, केलीमंद व प्राणनंद असे आठ चुलते व आठ चुलत्या होत्या त्याच सोबत बलराम नावाचा सावत्र बंधू व एका एकानंगा नावाची सख्खी बहीण होती. यातील प्रत्येक काका कशात ना कशात निष्णांत होता. कुणी गोधनाच्या ऋतुनुसार येणाऱ्या विकारांवर अचूक गुणकारी औषधी वनस्पती देई, कुणी सप्तसुरांना दावणीला बांधून संगीताचे नाना राग आळवी, कुणी उपनिषदाचा आधार घेत सुंदर प्रवचन करी यातील केलकीनंदन काका तर हुतूतू, हमामा, लगोरी, तळ्यात मळ्यात, खो-खो, आटापाट्या, सुरपारंब्या, जलतरण, मल्लविद्या अशा कितीतरी क्रिडाप्रकारात पारंगत होते.[७९] या सर्वामध्ये श्रीकृष्णाला सर्वाधिक प्रिय व आदराचे वाटायचे ते म्हणजे आजोबा 'चित्रसेन' या आजोबांनीच श्रीकृष्णाला जीवगीता कितीतरी ढंगांनी गोपभाषेत नीट समजावून दिली होती.[८०]

या व्यातिरिक्त श्रीकृष्णाला सगळे गोकुळ आपले घरच वाटत होते. त्यामुळे प्रत्येकाच्या घरात तो मुक्तपणे संचार करताना दिसतो.

श्रीकृष्णाने आपल्या चुलत्यांमधील प्रत्येक गुणांचा स्विकार केलेला दिसतो. तर चित्रसेन आजोबाची जीवनगीता सुध्दा त्याने पूर्णपणे आत्मसात केलेली दिसते. तसेच अभिरभानु वंशाची कुलपरंपरा सुद्धा त्याने आपल्या संस्कारी स्वभावातून स्वीकारलेली दिसते. तीच त्यांनी आयुष्यभर जोपासली. तसेच गोकुळात मुक्तपणे संचार करणाऱ्या श्रीकृष्णाने कोणत्याही प्रकारची उच्च नीच्चता सांभाळलेली दिसत नाही.

एकूणच श्री कृष्णाचे संपूर्ण जीवन म्हणजे आपल्या कुटूंबातील व्यक्तिंच्या चांगल्या गुणांच्या संग्रहाचे वर्धनशील चित्रच भासते.

## २) दृष्टांचे निर्दालन करुन अप्रतिम शौर्याचे प्रदर्शन करणारा–श्रीकृष्ण–

सहस्त्र पाकळ्याच्या कमलपुष्पांसारखा असणाऱ्या श्रीकृष्णाने आपल्या आयुष्यात अनेक सत्तांध राजांचे निर्दालन केले आहे. निष्पाप जनतेवर अन्यायाचा हासुड चालवणाऱ्या ससांध राजांना त्यामध्ये आपल्या रक्तातील नात्याच्या व्यक्तींचा सुध्दा त्याने निष्पात केला आहे. याचना घेऊन आलेल्या प्रत्येकाला त्याने भयमुक्त केले आहे. कारण अन्न, वस्त्र, निवारा ह्या जशा मानवाच्या प्राथमिक गरजा आहेत. त्यााच प्रमाणे 'संरक्षण' ही सुध्दा मानवाची महत्वपूर्ण गरज आहे. अशा संरक्षण भावनेला जर कोणी धक्का पोहचवित असेल तर त्याला निखंदून टाकण्याचे कार्य श्री कृष्णाने केलेले दिसते. हे कार्य त्याने केवळ राक्षसी प्रकृतीच्या मानवांना संपविण्यासाठीच केले होते. असे नव्हे तर गोकुळात असताना गोपांना ज्या पशुंन पासून भय वाटत होते. अशा सर्व पशूंना त्याने वधले आहे. त्यामध्ये पिसाळलेल्या व अव्दा-तव्दा चौखूर उधळलेल्या 'रानघोड्यालाा', यमुनेच्या डोहात दडी मारुन बसलेल्या अजस्त्र कालिया सर्पाला आणि अक्राळ विक्राळ जबड्याच्या रानगर्दभाचा सुध्दा समावेश आहे.

श्रीकृष्णाने आपल्या आन्यायी व अत्याचारी कंस मामाला सुध्दा यमसदनी पाठविले आहे. कारण कंस अतिशय अन्यायी होता. त्याने श्रीकृष्णाच्या सात भावंडांना शिळेवर आपटून ठार मारले होते. त्याची ही राक्षसी प्रकृती अत्यंत पराकोटीला पोहचली होती. त्यामुळे मथुराजन त्याला कंटाळले

होते. शेवटी श्रीकृष्णाने कंसाला ठार मारले. आणि 'सत्यासत्याच्या व्दंव्दात त्यानं आपल्या नात्याचा निधड्या मनान सर्वप्रथम बळी दिला'[८१] या शिवाय शिशुपाल, दंतवक्र या आपल्या आत्ते बंधुंना सुध्दा त्याने वधले होते. तसेच करवीरच्या अन्यायी राजा श्रृगाल, नरकासूर शाल्व, शतधन्वा अशा अनेक निर्दयी जुलमी राजांना त्याने यमसदनी धाडले होते.

कुरुक्षेत्रावरील अठरा दिवस चाललेल्या युध्दामध्ये सुध्दा त्याने अन्यायी नसलेल्या परंतु असत्याच्या पक्षात वावरणाऱ्या असंख्य योद्ध्यांना श्रीकृष्णाने वेधून घेतले होते. याचा अर्थ तो वधिक होता असे नव्हे तर 'धर्मस्यग्लानी' चा उद्भव झालेल्या प्रत्येक ठिकाणी दुर्बलांच्या, सज्जनांच्या पाठीशी उभा राहून श्रीकृष्णाने असत्याची पाठराखण करणाऱ्यांचे निर्दालन केले आहे. त्यामुळे श्रीकृष्ण म्हणजे 'अन्यायाची चीड् असणारा, समाजाला त्यापसून बंधमुक्त करणारा, सर्व सामान्य श्रमिक जनांत चटकण मिसळणारा एक सामर्थ्यशाली आदर्श राजा वाटतो'.[८२]

## ३) वर्ण निर्भयता आणि पौरुष चैतन्याचा प्रतिक श्रीकृष्ण –

आजपासून पाचहजार वर्षापूर्वी श्रीकृष्णाचा जन्म झाला होता. त्याकाळी भारतीय समाज हा आपल्या चार्तुवर्ण्य रचनेत अतिशय काटेकोर जीवन जगित असणार हे कर्णाच्या जीवनावरुन लक्षात येते. याचाच अर्थ त्या काळी धर्म सिध्दांतांचा फार मोठा प्रभाव भारतीय समाज मनावर होता. मात्र अशा वेळी श्रीकृष्णाने एक युगंधरी मन्वंतरी घडवून आणले. 'ऋक्षवान' पर्वतातील 'जांबवान' या आदिवासी राजाची कन्या 'जांबवती' या आदिवासी कन्येचा त्याने पत्नी म्हणून स्वीकार केला होता. एक चांद्रवंशीय क्षत्रिय नरश्रेष्ठांन एका आदिवासी वनकन्येचा पत्नी म्हणून सादर स्वीकार केला होता. या आर्यावर्तात यापूर्वी अस कधीच घडलं नव्हतं[८३] की त्याच्यापूर्वी एकाही क्षत्रिय वा उच्च वर्णियांन असं जीवनगंगेला समूक वळण देण्याच आदर्श कर्म केलेले नाही.[८४]

प्राचीन काळात 'जांबवती' या आदिवाशी कन्येशी विवाह करुन तिला व्दारकेत आणणारा व पत्नी म्हणून गौरवाच स्थान देणारा एकमेव श्रीकृष्ण आहे. पांडवांनी केलेल्या राजसूय यज्ञात आमंत्रितांची उष्टी पात्रं तो उचलतो, एवढेच नव्हे तर आपल्या गरुड ध्वज रथाच्या चारही घोड्यांचा तो स्वतः खरारा करतो. सारथी असणाऱ्या दारुकाला रथाच्या मागील घेरात बसवून स्वत: रथनीडा सावरुन 'गरुड ध्वजाच' सारथ्य करतो. दारुकालात धुण्यासाठी व पुसण्यासाठी स्वत: मदत करतो.

श्रीकृष्ण कुठलंच जीवन घडविणार कर्म कधीच निषिद्ध मानीत नाही. 'उपनिषदकालापर्यंत पिढ्यान पिढ्या झिरपत आलेलं एक वैदिक'सुर्य किरणवत, शाश्वत सत्यकी' नहि मनुष्यात श्रेष्ठतर किंचित![८५] हे कृष्णाला परिपूर्ण समजल होत. या वरूनच श्री कृष्णाने माणसाचे मोठेपण हे त्याच्या वरुन अथवा कर्मावरुन ठरत नसून तो वागवीत असलेल्या विचारावर ते अवलंबून असते. असे माननारा दिसतो. त्यामुळेच तो पौरुषचैतन्याचा व वर्ण निर्भयतेचा प्रतिक ठरतो.

### ४) स्त्रीकडे कसे बघावे याचा भारतीय जीवन प्रणालीत चांगला मार्ग दाखवणारा –

श्रीकृष्णाने आपल्या प्रदीर्घ 'जीवनात भेटलेल्या शब्दश: लाखो स्त्री पुरुषाशी निखळ बावन्नकशी 'प्रेमयोगानंच' वागला. त्यामुळे श्रीकृष्ण म्हणजे महाभारतातील प्रेम करणारी व्यक्तिरेखा असा परिचय सर्वदूर पसरला. श्रीकृष्णाला सखे अनेक आहेत. अर्जुन, उध्दव, सात्यकी, दारुक इ. परंतु सख्या केवळ दोनच आहेत. एक राधा व द्रौपदी. श्रीकृष्ण आणि द्रौपदी मधील सख्यत्वाकडे समाजाने, साहित्यिकांनी, आणि अभ्यासकांनी सतत सशक्त व सुदृढ दृष्टीकोनातूनच पाहिले. परंतु श्रीकृष्ण आणि राधेच्या जोडीकडे मात्र समाजाने व विशेषत: साहित्यिकांनी शृंगारिकतेच्या एक तिरकस कटाक्षानेच पाहिले.

वास्तविक राधा या जनमानसात पक्क्या रुजलेल्या व्यक्तिरेखेला भागवत, महाभारत, हरिवंश पुराण किंवा ब्रह्मवैवर्तासारख्या श्रीकृष्णाशी निगडीत अधिकृत संदर्भ ग्रंथापैकी एकातही निसटताही संदर्भ नाही ! तिचं नावसुध्दा एखाद्या उपस्थितांच्या दीर्घ यादीतही नाही.[८६] ब्रह्मवैवर्त पुराणामध्ये मात्र राधेला 'बाल श्रीकृष्णाची' भावसखी म्हटले आहे.[८७] याचाच अर्थ राधा ही व्यक्तिरेखा श्रीकृष्णाच्या चरित्रात घुसडली गेली नाही तर ती अत्यंत सामान्य स्वरुपात श्रीकृष्ण चरित्रात हजेरी लावते. मात्र पंधराव्या शतकात लिहिलेल्या 'गीत गोविंद' या कवी जयदेवांच्या शृंगाररसप्रधान रसाळ खडकाव्यातून तिला श्रीकृष्णाची प्रियसी म्हणून दाखविली आणि हाच धागा पकडून गेली अनेक शतकं राधा कृष्णाच्या जोडीला साहित्यिकांनी शृंगाररसामध्ये मनसोक्त मढवून सादर केले. राधेचा पदर धरुन हिंदी काव्यक्षेत्रात तर लंपट श्रीकृष्णांना शतकानुशतकं नुसता असमर्थनीय धुमाकूळ घातला. इथूनच वास्तवात भेटलेल्या प्रत्येक स्त्रीचा आदर करणारा श्रीकृष्ण स्त्रीलंपटतेकडे भरकटत गेला.[८८]

युगंधर मध्ये मात्र राधेला एक प्रतिनिधीक गोप स्त्री म्हणून सादर करण्यात आले आहे. गोकुळात श्रीकृष्णाची 'भावसखी' म्हणून वावरणारी राधा ही अरिष्ट ग्राम ची माहेरवाशीण असते तर गोकुळ आपल्या मामाच्या घरी ती सासुरवाशीण असते. 'रायाण' हा तिचा पती असतो. अशा राधेचे व बालकृष्णाचे नाते निरामय व अंतरीच्या मर्म बंधाच्या तोडीचे युगंधर मध्ये दाखविण्यात आले आहे. त्यामुळे राधा-कृष्ण हे दोन शरीर उरली नव्हती. दोघांच्याही रुपानं एकच एक थरकती जीवज्योत भानहर रासमय झाली होती ! एकरुप झाली होती ![८९] या एकरुपतेतूनच श्रीकृष्णाला स्त्रीत्वाच्या सर्व भावविभावांची व कळांची दीक्षा मिळाली होती. तसेच वासनारहित, भावभरित, अतुल प्रेमयोगाची, मधुरा भक्तीची दीक्षा सुध्दा श्रीकृष्णाने तिच्याकडून घेतली होती. म्हणून श्रीकृष्णाने तिला पहिली स्त्री गुरु मानले होते व तिने दिलेल्या मोरपीस, वैजयंतीमालेला आयुष्यभर प्राणपणाने जपले होते. त्यामुळे 'आचार्य सांदीपनींच्या पूर्वीच श्रीकृष्ण घडविणारी अबोल' आचार्य म्हणून ती युगंधर मध्ये वावरते.[९०] एका स्त्रीला गुरु करुन घेणाचा आदर्श प्राचीनांमध्ये श्रीकृष्णा शिवाय आढळत नाही.

असे असताना सुध्दा 'सोळा सहस्त्र नारी भोगून श्रीकृष्ण ब्रह्मचारी !'' अशी विवेकशूल्य म्हण श्रीकृष्णाच्या चरित्राचे हनन करताना दिसते. मात्र या बेछूट विधाना मागची वस्तुस्थिती युगंधर मध्ये स्पष्ट होते. सत्तांधव मदांध झालेल्या नरकासुराने सोळा हजार कुलस्त्रिया बंदिवान केल्या होत्या. नरकासुराचा वध करुन त्या स्त्रीयांना मुक्त करण्याचे कर्तव्यकर्म श्रीकृष्णाने केले. मात्र या वेळचे समाज जीवन हे अत्यंत तर्कशून्य तत्वांवर चालले होते. त्यामुळे एका हव्याशी राजांच्या ताब्यात असणाऱ्या या स्त्रीयांना पुन्हा समाजात गौरवाने वावरणे अशक्य झाले होते. त्यामुळे यामधील 'कशेरु' नावाची स्त्रीने आपली विकलता श्रीकृष्णासमोर मांडली. अभयदान मागितले. प्रत्येक भयग्रस्त व्यक्तिला आपल्या अप्रतिम शौर्याच्या जीवावर भय मुक्त करणाऱ्या श्रीकृष्णाने समाजाच्या तर्कशून्य परंपरेविरुध्द 'युगंधरी निर्णय घेतला' व नरकासूराच्या राज्यात सर्व प्रजाजनांसमोर श्रीकृष्णाने या सर्व स्त्रीयांशी गांधर्वविवाह घोषित करुन त्यांचे पतीपण स्विकारले. पती या शब्दाचा मुळ अर्थ आहे जो पुरुष भरण, पोषणाची आणि संरक्षणाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडतो त्याला 'पती' म्हणतात. त्यामध्ये वडील, मुलगा, बंधू इ. नात्यातील व्यक्तिंचा समावेश होतो. परंतु काळपरत्वे पती या शब्दाचा अर्थाचे 'अर्थविशेषीकरण' घडले व पती या शब्दाचा केवळ 'नवरा' हाच अर्थ प्राप्त झाला. त्यामुळे श्रीकृष्ण हा या सोळा हजार

स्त्रीयांचा काळाच्या ओघात नवरा ठरला.

जागतिक इतिहासात असं सहस्त्रावधी स्त्रियानां प्रकट व सामुदायिक अभयाचं धीरोदात्त उदाहरण दुसर नाही.[११] एकूणच निसर्गातल्या 'स्त्री' या जीवन तत्तवांकड पूर्णत: प्रगल्भ व परिणत दृष्टीनं श्रीकृष्ण आपल्या जीवनभर बघताना दिसतो.[१२]

**५) चाकोरीबद्‌ध झालेली भारतीय जीवनशैली विधायक विचारांनी पुन्हा प्रवाही करणारा महानायक –**

श्रीकृष्णानांचे संपूर्ण जीवन हे घटना संपन्न आहे. त्याच्या जन्मापासून ते अखेरच्या क्षणापर्यंत त्याच्या जीवनात असा एकही क्षण येत नाही. त्यावेळी काही त्याच्या हातून अकाल्पित घडत नाही. त्यामुळे श्रीकृष्ण ही सर्वार्थिने जीवन घडविणारी विभूती आहे.[१३] वाढ आणि विकास ही जीवनाची मूलभूत लक्षणे आहेत असे मानणाऱ्या श्रीकृष्णाने या लक्षणाच्या आड येणाऱ्या आणि मानवी जीवन बिघडवू पाहणाऱ्या दुष्ट व आशिव शक्तींना आपल्या चाणाक्ष बुध्दियोगांन प्रथम अचूक हेरले व प्रसंगानुरूप वेगवेळया बुध्दिकौशल्याचा उपयोग करून विलंबन घेता त्यांचा समूळ नायनाट केला.

श्रीकृष्णाने सर्वप्रथम अन्यायी व संत्तांध स्वार्थी अशा मथुराधिपती कंस मगधांधिपती जरासंध, मद्राधिपती शल्य, सिंधुअधिपती जयद्रथ चेदिराज शिशूपाल अशा एकपेक्षा एक सामर्थ्यशाली वीरांना निपटले कारण भारतीय जीवन गंगेला अशा राजांच्या कारभाराचा अडसर ठरत होता. हे सर्व राजे अन्यायी होते अशा या अन्यायी व उन्मत्त स्वभावाचा अंत असाच होतो. हे श्रीकृष्णाने आपल्याकृतीतून दाखवून दिलेले दिसते. अशा अन्यायी प्रवृत्तीचा नाश करीत असताना प्रत्येक प्रसंगी त्याने आपल्या अप्रतिम पौरूषाचा सर्वस्वी नवाच अन्याय असा आविष्कार घडविला. हेच त्याचे 'युगंधरी'रूप ठरते.

या शिवाय श्रीकृष्णानी समाजाच्या वैचारिक विकासाला बांध घालू पाहणाऱ्या माणसातील एकारलेल्या, नकारात्मकदृष्टीला बदलून त्या ठिकाणी डोळस सकारात्मक दृष्टी देण्याचा देखील प्रयत्न केला आहे. त्यासाठी तो जीवनात भेटलेल्या प्रत्येक व्यक्तिशी निखळ प्रेमयोगनेच वागला. तसेच जीवन घडविणारे प्रत्येक कर्म त्याने आनंदाने केले. या शिवाय आदिवासी 'जांबवती' हिच्याशी केलेला विवाह, राजसू यज्ञात आमंत्रितांची उष्टे पात्रे उचलणे अथवा गरीब ब्राह्मण असणाऱ्या सुदामाशी मैत्री

सारथी असणाऱ्या दारुकाशी सख्यत्व एवढेच नव्हे तर स्त्री असणाऱ्या राधिकेचे स्वीकारलेल शिष्यत्व ह्या सर्व गोष्टीत श्रीकृष्णाने सर्व समाजाला 'नहि मनुष्यात श्रेष्ठतर किंचित' माणसात श्रेष्ठता आणि कनिष्ठता नसते याची शिकवणच दिलेली आहे. कारण श्रीकृष्ण कालिन समाज हा चातुर्वण्य व्यवस्थेवर पूर्णत: अवलंबून होता. त्यामुळे माणसाचे मोठेपण हे तो ज्या वर्णात जन्माला आला आहे त्यावर ठरविले जात होते. परंतु श्रीकृष्ण हा माणसाचे मोठेपण हे त्याच्या जन्मावर अवलंबून नसून तो वागवित असलेल्या विचारावर अवलंबून असते. असे माननारा होता. त्यामुळे शिवकर विचारांची पेरणी करणारा श्रीकृष्णाची ही कार्य म्हणजे चाकोरीबद्‌ध झालेली जीवनगंगा विधायक विचारांनी प्रवाही करणारी आदर्श कर्मच ठरतात.

## ६) अद्‌भूत स्थितप्रज्ञता :

घटना संपन्न आयूष्य लाभलेल्या श्रीकृष्णाच्या जीवनाची बैठक अद्‌भूत स्थितप्रज्ञतेवर अवलंबून होती. स्थितप्रज्ञता ही निर्विकार अलिप्तपणाच्या कसोटीवर स्थिरावलेली असल्या कारणाने श्रीकृष्णाच्या जीवनात असणारी स्थितप्रज्ञता आणि निर्विकार अलिप्तपणा हा अत्यंत अद्‌भूत होता. हे त्यांच्या जीवनातील अनेक प्रसंगातून लक्षात येते.

जिथं जिथं सामान्याला तर पडेलच: पण असामान्य गुणवत्तेच्या माणसालाही मोह पडेल. अशी दोन जीवनसत्यं म्हणजे सत्ता आणि स्त्री श्री कृष्णाने या दोन्ही जीवनसत्यांना आपल्या हातातील मुरली जशी सहजपणे हाताळावी, तसं वागविताना दिसतो. त्यामुळे त्यामुळे हजारो वर्ष श्रीकृष्ण भारतीय समाजाला विलोभनीय व आदर्श वाटत आला आहे.

श्रीकृष्णाच्या जीवनातील स्थितप्रज्ञतेचे सर्वांत महत्त्वाचे उदाहरण म्हणजे नरकासूराच्या ताब्यातून सोडविलेल्या सोळाहजार कामरूप स्त्रीयांशी गांधर्व विवाह करणारा श्री कृष्ण कोणत्याही प्रसंगी चलित झालेला दिसत नाही. तसेच कांपिल्यनगरीच्या द्रुपद राजाने श्री कृष्णाला द्रौपदी स्वयंवरात सहभागी होण्यासाठी आमंत्रित केले होते. उपस्थित असणाऱ्या श्रीकृष्णाने एक निर्वाणीच्या प्रसंगी पण जिंकण्यासाठी पुढे ही झाला होता. त्यावेळी यज्ञकन्या असणाऱ्या द्रौपदीच्या विषयी श्रीकृष्णाच्या मनात अनेक भाव तयार होत होते आणि त्याचप्रमाणे दौपदीच्या मनात सुध्दा अनेक विचारांची आवर्तने सुरू होती. पण

धर्नुधर अर्जुनांने पण पूर्ण केला. त्याचवेळी श्रीकृष्णाने आपल्या अर्तमनातील द्रौपदी बद्दलच्या प्रेमाला एक अजोड वळण दिले. की जे हजारो वर्ष भारतीय समाज मनाला आदर्श ठरले. जी द्रौपदी पत्नी म्हणून श्रीकृष्णाच्या जीवनात आली असती श्रीकृष्णाने मानसभगीनी मानली व 'सखी' म्हणून अजरामर केली. श्रीकृष्ण व द्रौपदी मधील हे नाते म्हणजे 'निवळशंख स्फटीका सारख्या बंधुभावापेक्षाही पारखायला कठीण असे होते.[१४] या प्रसंगातूनच श्रीकृष्णाच्या अंगी असणारा कमालीचा धीरोदात्तपणा लक्षात येतो.

या शिवाय सत्राजिताने श्रीकृष्णावर सम्यंतक मण्याच्या चोरीचा घेतलेला आरोप या प्रसंगात किंवा कुरुंच्या सभेत पांडवांनी बाजू घेऊन गेलेल्या श्रीकृष्णाचा दुर्योधनाने सामान्य गवळी असा केलेला अपमान या प्रसंगात सुद्धा श्रीकृष्णाने शांत, संयमी व अलिप्तपणाने दर्शन घडविले आहे. खांडवना सारख्या निबीड असण्याचे इंद्रप्रस्थ सारख्या सुजलाम सूफलाम नगरीत रूपांतर करण्यासाठी श्रीकृष्णाने निरतीशय प्रयत्न केले होते. मात्र युधिष्ठिराने केवळ एका क्षणात द्युताच्या खेळात ते राज्य गमाविले तेव्हां ही श्रीकृष्णाने आपल्या स्थितप्रज्ञतेचा प्रत्यय दिला आहे. तर दुर्वास ऋषींच्या शापाची परिणिती सुद्धा त्याने अत्यंत अलिप्तपणे पाहिला. त्याच्या ह्या अलिप्तपणाची चरण सीमा[४] म्हणजे त्यांने आपला देह भालका तीर्थवरच्या अरण्यात एका अश्वत्थ वृक्षाखाली आपल्या प्रियजना पासून दूर विसर्ग केला.

हे सर्व प्रसंग म्हणजे युगंधराच्या ठायी असणाऱ्या अद्भूत स्थितप्रज्ञता व निर्विकार अलिप्तपणा यांची साक्ष देतात. महाभारताच्या कथासागरात सहस्त्रावधी पाकळ्याच झळझळीत व टवटवीत सर्वकाळ प्रफ्फुल्ल असणार श्रीकृष्ण रूपी नीलकमल मनसोक्त पण तितक्याच स्थितप्रज्ञतेन डोलताना दिसते.

## ७) अलौकिक औदार्य –

सहस्त्र पाकळ्यांच्या कमलदलाप्रमाणे असणाऱ्या श्रीकृष्ण अनेकढंगी व्यक्ति मत्त्वाने वटवृक्षाप्रमाणे विस्तारला आहे. तर त्याचे चरित्र हे सलग अंत:स्त्रोत असलेली निखल श्रेयसाची घटना आहे. अशा अनेक गुणवैशिष्टयांनी युक्त असणारा श्रीकृष्ण जेवढा पराक्रमी होता त्याही पेक्षा त्याच्या जवळचे दुसरे अप्रतिम गुण त्याच्या लौकीकात भर घालतात. त्याच्या जवळचा र्निलोभीपणा व निस्वार्थीपणा हा सुध्दा एक असाच गुण आहे. मात्र हा गुण श्रीकृष्णाच्या जीवनाचे जणु जीवनसूत्रच ठरतो. कारण त्याच्या

सारखा निर्लोभी व निस्वार्थी क्वचितच दुसरा सापडेल श्रीकृष्णाला जन्मापासून ते अखेरच्या क्षणापर्यंत कोणत्याही प्रकारचा स्वार्थ अथवा लोभ झालेला नाही.

श्रीकृष्णाने आपल्या संपूर्ण आयुष्यामध्ये जीवन गंगेला अडसर ठरणाऱ्या अनेक उन्मंत्त राजांना यमसदनाचे रहिवासी केले. परंतु त्या राजाच्या राज्यावर त्याने कधी सुद्धा अधिकार सांगितलेला दिसत नाही. उलट त्या राजांच्या उत्तराधिकारीनांच त्याने सिंहासनावर बसविले कारण श्रीकृष्णाचा उद्देश हा अन्यायी व दृष्टप्रवृत्तीचा राजांचे निर्दालन करून अन्यायांचा शेवट हा कसा होतो. एवढेच त्याला समाजाला दाखवावयाचे होते. सत्तेच्या हव्यासाने प्रेरित होऊन श्रीकृष्णाने आपल्या आयुष्यात कोणत्याही प्रसंगी लढाई केलेली नाही.

सम्यंतक मण्याच्या प्रकरणात सुद्धा त्याचा हाच गुण प्रत्ययाला येतो. हाती आलेला संम्यंतक मणी परत सत्राजीताच्या स्वाधीन करणारा श्रीकृष्ण म्हणजे अलौकिक औदार्याचे प्रतिकच ठरतो. युद्धाखेरीज सर्वत्र संयम हाच क्षत्रियाचा धर्म आहे.[१५] असे मानून चेदीराज शिशूपालाचे नव्व्याणव अपराध क्षमा करणारा आणि स्वत:च्याच तळ पायात प्राणघातक सूची बाण मारणाऱ्या 'जरा' नावाच्या व्याध्याला क्षमा करणारा श्रीकृष्ण म्हणजे 'आभाळा एव्हढा अभयदानी महायोध्दा[१६] ठरतो'.

## ८) लोकोत्तर मित्र

'युगंधर' मध्ये वेगवेगळ्या रूपात वावरणाऱ्या श्रीकृष्णाला शिवाजी सावंत यांनी अत्यंत संस्मरणीय स्वरूपात चित्रीत केला आहे ते म्हणजे एका 'स्नेहीच्या' अथवा मित्राच्या श्रीकृष्ण-अर्जुन, श्रीकृष्ण-सुदामा, श्रीकृष्ण-दारूक ही त्याचे वैशिष्टय पूर्ण उदाहरणे आहेत.

या स्नेहींच्या भेटीत श्रीकृष्ण स्वत:ला स्नेहयोगाच्या कर्मांत स्वत:ला गढून घेतो[१७] गरीब ब्राह्मण असणाऱ्या सुदामाशी श्रीकृष्णाचा असलेला स्नेह म्हणजे केवळ अजोड ठरावा. अशा योग्यतचो असलेला दिसतो. सांदीपनीच्या अंकपाद आश्रमात विद्यार्जन करणाऱ्या श्रीकृष्ण आणि सुदामाचा स्नेहबंध जुळतो. व्दारकेत आपल्या मित्राला भेटावयास आलेला सुदामा व्दारकाधीश श्रीकृष्णाच्या ऐश्वर्यच्या दर्शनाने बाबरतो. अशा बावरलेल्या सुदामाशी श्रीकृष्णाने केलेले वर्तन व त्याची आनंदाने

स्वीकारलेली स्नेहभेट आणि सुदामाचे ऐश्वर्यमय केलेले जीवन म्हणजे मित्रप्रितीच्या कालजयी तत्त्वज्ञानाचे एक प्रेरणाकेंद्रच वाटते.

वास्तविक अर्जुन हा श्रीकृष्णाचा आत्तेबंधु होता. परंतु श्रीकृष्ण व अर्जुन यांच्यातील स्नेह हा लोकोत्तर मित्रत्वाचा होता. या मित्रत्वाचे रूपांतर रक्ताच्या नात्यात करण्यसाठी श्रीकृष्णाने रचलेले सुभद्राहरणाचे नाटक, अथवा कुरूक्षेत्रावर अनेक महारथीच्या पासून अर्जुनाला वाचविण्यासाठी वेगवेगळया योजना करणे तसेच गीते सारखे अगाध तत्त्वज्ञान सर्वप्रथत: अर्जुनालाच सांगणे या श्रीकृष्णाच्या सर्व कृती त्याच्या ठायी अर्जुना बद्दल असलेले मित्रत्व प्रकट करते. अशा अतूट जोड व्यतिमत्त्वचा दुसरं कुठलच उदाहरण जागतिक इतिहासात आढळत नाही. म्हणूनच श्रीकृष्णाला समजून घेण्यासाठी अर्जुनाच्या व्यक्तिरेखाचा दर्पणासारखा वापर करून त्यात व्दारकाधीशाचं प्रतिबिंब पहावं लागतं.

या शिवाय भुरिश्रव्याला अर्जुनाकडून वधवून सात्यकीला वाचविणारा श्रीकृष्ण आपल्या मित्रप्रितीचाच प्रत्यय देतो. तर सारथी दारूकाला गरूडध्वज रथाच्या मागच्या हौदात बसवून स्वत: रथनीडा हातात घेणारा आणि दारूकाला आपल्या बरोबरीने पंक्तीचा मान देणारा, त्याला हात धुण्यासाठी स्वत:हून जलकुंभ देणारा श्रीकृष्ण मित्रत्त्वाचा एक श्रेष्ठ आणि उच्चतम अशा लाकोत्तर आदर्शच ठरताना दिसतो.

## ९) चिरंतन प्रेमपूर्ती

आयुष्याच्या वाटचालीत भेटलेल्या प्रत्येक स्त्री पुरूषांची निखळ बावन्नकशी प्रेमयोगाने वागणाऱ्या श्रीकृष्णाने केवळ माणसांच्यावर आपला प्रेम वर्षाव केला नाही तर मनुष्य जातीला जीवन जगण्यासाठी आवश्यक असणाऱ्या प्रत्येक गोष्टीवर त्याने प्रेम केले आहे. आणि चरा चराला प्रेमयोगाची शिकवण दिली आहे.

गोकुळात गोप म्हणून वावरत असताना श्रीकृष्णाने गोधनाच्या संरक्षणासाठी वेगवेगळ्या केलेल्या योजना त्याच्यामधील निरंतन प्रेमाची साक्ष देते. तर मथुरेत आपल्या गरूड ध्वजाच्या अश्वांची मनापासून चौकशी करणारा त्याच्या केसाळ मानेत हात घुसळणारा आणि प्रसंगी त्या अश्वांशी हितगुज

करणारा श्रीकृष्ण दिसतो. कारण श्रीकृष्णाला घोडा हा प्राणी फार प्रिय होता त्याची वाऱ्याशी स्पर्धा मांडणारी धावगती श्रीकृष्णाला सर्वाधिक आवडीची होती.

प्राणि मात्रावर अशा प्रकारचे प्रेम करणाऱ्या श्रीकृष्णाचे जंगलावर सुद्धा असेच प्रेम होते. जरासंधाच्या आक्रमणाला पिटाळून लावण्यासही श्रीकृष्णाने आश्रय घेतलेल्या गोमंतक पर्वतावरील जंगलालाच वणवा लावला व जरासंधाचे आक्रमण परत पाठविले. मात्र या वणव्यामुळे निसर्गाने अनेक वर्ष तपस्या करून उठविलेलं सुंदर वनरुपी धन दग्ध करताना मात्र श्रीकृष्णाच्या मनाला तीव्र यातना झालेल्या होत्या. तसेच त्या वणव्यात जंगली प्राण्यांचे झालेले हाल या कल्पनेने सुद्धा श्रीकृष्णाला अनंत यातना होताना दिसतात. कर्तव्यापुढे भावनेला बाजूला सारण्याचा असाच दुसरा प्रसंग श्रीकृष्णावर आलेला दिसतो. तो खांडवनाचा दाह करून तिथे इंद्रप्रस्थ उभारतानाचा मात्र या प्रसंगी श्रीकृष्णाने आपल्या मधील चिरंतन प्रेम सरीतेचा अतिउच्च आदर्श सिद्ध केला आहे नव्या नियोजनबध्द राजनगरातसुध्दा सुंदर वन उठवावी लागतात.[१८] हा विचार म्हणजेच निसर्गाबद्दल श्रीकृष्णाच्या मनात असलेल्या प्रेमाची साक्षच देते.

## १०) परार्थ जीवन :-

अद्‌भुत स्थितप्रज्ञता आणि अलौकिक औदार्य या गुणांनी युक्त असणाऱ्या श्रीकृष्णाचे संपूर्ण जीवन हे परार्थ जीवन असल्याचे दिसते. जीवनाच्या कोणत्याही वळणावर स्वार्थी न झालेला व प्रत्येक सुख दुःखात मन स्थिर ठेवणारा श्रीकृष्ण आपल्या जीवनातील प्रत्येक क्षण हा दुसऱ्याच्या सुखासाठीच खर्ची घातलेला दिसतो.

श्रीकृष्णाने आपल्या आयुष्यात अनेक क्षत्रीय राजांना निखंदले ते त्याचे राज्य बळकविण्यासाठी नव्हे तर त्या क्षत्रिय राजांच्या अन्यायी राज्य कारभाराला कंटाळलेल्या, असुर प्रवृत्तीच्या राजांच्या अन्यायाला बळी पडलेल्या नगरजनांना सोडविसाठीच पांडवांना इंद्रप्रस्थ उभे करून देताना श्रीकृष्णाने केलेले प्रयत्न हे सुद्धा त्याच्या परार्थ जीवनाचेच द्योतक आहे. त्याच्या ह्या परार्थ स्वभावाचा परमोच्च बिंदू म्हणजे कुरूक्षेत्रावरील युद्ध संपल्या नंतर अश्वत्थामाने समंत्र ब्रम्हास्त्राचे प्रक्षेपण केल्यावर श्रीकृष्णाने आपले सर्व पुण्य पणाला लावून पांडवांचा कुलक्षय वाचविला. तसेच हजारो कामरूपी स्त्रियांच व्दारकेत

पुनर्वसन केल होत. कुरूक्षेत्रावर धारातीर्थी पडलेल्या यादव वीरांच्या कुटूंबाचेही त्याने लक्षपूर्वक पुर्नवसन केलेले दिसत.

एवढेच नव्हेतर अखेरच्या दिवसात श्रीकृष्णाने उद्धवाला जो काही अध्यात्मीक उपदेश केला तो सुद्धा त्याने बंदरीकेदारला आश्रम उठवून तिथे स्वत:राहून मानवांच्या पिढ्यानपिढ्यांपर्यंत पोहचविणे आवश्यक असल्याचे वचन उद्धवा कडून घेतले. म्हणजेच श्रीकृष्ण हा परमावधीची आसक्ती आणि पराकोटीची विरक्ती आपल्या एकाच जीवनात सांधणारा योगयोगेश्वर आहे. जन्मापासून ते अखेरच्या क्षणापर्यंतचे आपले सर्व जीवन लोकल्याणसाठी लावणारा श्रीकृष्ण हा परार्थ जीवनाचा आदर्श ठरतो.

## ११) सुज्ञ

अनेक अन्यायी राजांना रणांगणात आव्हान देणारा श्रीकृष्ण ज्या प्रमाणे पराक्रमी योद्धा होता. त्याचप्रमाणे आपल्या प्रत्येक कृतीची परिणीती कशात होऊ शकते. त्या परिणामाची जाण ठेवून कृती करणारा तो सुज्ञ मुत्सद्दी राजकारणी सुद्धा होता. म्हणून तर त्याला संपर्कातल्या प्रत्येक व्यक्तिच्या गुणाची व अवगुणाची जाण होती. महाभारतात ज्याला कृष्ण शिष्टाई म्हणून ओळखले जाते त्या प्रसंगातून श्रीकृष्णाच्या अंगी असणाऱ्या सुज्ञ पणाची कल्पना येते.

पांडवांना आपला न्याय हक्क मिळावा म्हणून कुरूंच्या राज्यसभेत पांडवांच्या बाजूने शिष्टाई करण्यासाठी जाणाऱ्या श्रीकृष्णाने सूड भावनेने पेरलेल्या, आतताई आणि कमालीचा स्वार्थी असणाऱ्या दुर्योधनाशी गाठ पडणार आहे. प्रसंग पडलाच ती पुढं घट्ट आवळली जाणार आहे. तिथे रूपांतर करतात होईल हे सांगता येत नव्हत[११] हे जाणुन स्वत:च्या संरक्षणासाठी सेनापती सात्यकीला आणि तीन ते चार वेळा प्राणहुतीची परीक्षा घेतलेले प्राणकुर्वंडी पथकाला त्याने बरोबर घेतले होते.

## १२) मर्मज्ञ आणि अष्टावधाने –

स्वत:च्या संरक्षणाबद्दल सावध असणाऱ्या श्रीकृष्णाला मात्र शत्रुची मर्मस्थाने तात्काळ कळत होती. समय सूचकतेने त्या मर्मस्थानावर तो घाव करीत होता. आघात करीत होता शत्रुची मर्मस्थाने जाणून घेण्यासाठी श्रीकृष्ण आपल्या गुप्तहेरांचा उपयोग करीत होता. अथवा आपल्या उचित बुध्दीमत्तेच्या

जोरावर ती ठरवित होता. त्याच्या ह्या कौशल्याचा प्रत्यय भीष्माचार्यांच्या द्रोणांच्या वधाच्या वेळी आणि व्दारकेवर जरासंधाच्या आक्रमणाच्या प्रसंगातून स्पष्ट होते. जामाता कंसाच्या मृत्युचा प्रतिशोध घेण्याच्या ईर्षेला बळी पडून जरासंधाने आपल्या महापराक्रमी सेनापती 'हंस व डिभक' यांना व्दारकेवर सोडले. हंस व डिंभक हे परस्परावर अतीव प्रेम असणारे रणकुशल वीर होते. त्यामुळे त्या दोघांनाही एकाच रणभूमीवर जिंकणे कदापि शक्य नसल्याची खात्री श्रीकृष्णाला होती. म्हणून त्याने त्या दोघांनाही निरनिराळी आक्रमणे करून वेगळे पाडले.

अन्यायी माणसांचा स्वभाव हा अतिशय अहंकारी असतो या त्रिकालाबाधीत सत्याचा फायदा उचलत श्रीकृष्णाने डिंभकाचा अहंकार फुलविला आणि बलरामा करवी त्याला मल्लयुध्दामध्ये आस्मान दाखविले. आणि ही वार्ता श्रीकृष्णाने आपल्या गुप्तचरांच्या मार्फत हंसाच्या कानावर पोहचविली. साहजिकच डिंभकावर अतीव प्रेम असणाऱ्या हंसाने कोणताही विचार न करता वियोगाच्या दु:खात आत्महत्येचे कृत्य केले. आणि जरासंधाचे आक्रमण मोडीत निघाले.

कुरूक्षेत्रावर अनावर संतप्त झालेल्या भीष्मांचे आणि अर्जुनाचे व्दंव्द युद्ध सुरू झाले. याप्रसंगी सुद्धा श्रीकृष्णाने आपल्या मर्मश पणाचे दर्शन घडविले आहे. दिलेल्या शब्दाला एकनिष्ठ राहणारा भीष्मांचा स्वभाव आणि युद्ध नियम यांची सांगड घालत श्रीकृष्णाने भीष्मांचार्यावर सुद्धा मर्मभेदक आघात घडविला होता. त्यासाठी त्याने स्त्रैण्यात गणल्या जाणाऱ्या शिखंडीचा तर नि:शस्त्रसारथी म्हणून कधी कधी स्वत:चा अर्जुनाच्या संरक्षणासाठी वापर केला होता. असाच मर्मभेदक आघात श्रीकृष्णाने कौरव पांडवांच्या गुरू म्हणून ओळखल्या जाणाऱ्या द्रोणाचार्यांवर केला होता. आणि त्यासाठी त्याने द्रोणाचार्यांच्या पुत्रप्रेमाचा खोचक वापर केला होता. अश्वत्थामा नावातील साम्याचा सुद्धा यासाठी श्रीकृष्णाने इंद्रवर्माच्या गजदलातील 'अश्वत्थामा' नावाच्या हत्तीचा भिमाकरवी वध करवून घेतला, आणि आपल्या गुप्तचरांच्या मार्फत कुरूक्षेत्रावर अश्वत्थामा पडला अशी मायावी आरोळी ठोकून घेतली पुत्राच्या अकस्मिक मृत्युमुळे द्रोणाचार्य हतबल झाले व त्यांनी शस्त्र टाकले. या सर्व घटनां मधुन श्रीकृष्णाची अंगी जो मर्मसपणा होता तो तर प्रत्ययास येतोच मात्र त्याच्या या निर्विवाद यशा मध्ये त्याच्या अंगी अ सणाऱ्या अष्टावधानी स्वभावाचा सुद्धा फार अनुभव होतो.

अष्टावधानी व्यक्ती हा काळाचे आणि वेळेचे भान असणारा व प्रसंगानुरूप आपली वाटचाल निश्चित करणारा, स्वत:ची क्षमता परिपूर्ण जाणलेला असतो. श्रीकृष्ण देखील अष्टावधानाचे मुर्तीमंत उदाहरण असलेला युगंधर मध्ये प्रत्ययास येतो. कारण त्याने दरवेळी शत्रुचे निर्दालन करताना थक्क करणाऱ्या पौरूषाचा सर्वस्वी नवाच अकल्पित असा अविष्कार घडविला आहे. त्याचा प्रत्यय जरासंध, श्रृगाल, शतधन्वा, भीष्माचार्य, द्रोणाचार्य, जयंद्रथ, कर्ण, इ. वधामधून येतो. त्यामुळे अष्टावधानी श्रीकृष्ण अशी व्यक्तिरेखा युगंधर मध्ये प्रभावी पणे साकार करण्यात शिवाजी सावंत यशस्वी झाले आहेत.

## १३) कल्याणकारी राज्याचा विचार करणारा – लोकनेता श्रीकृष्ण

रासलिलेत बासरी वादनात आणि रणांगणावर रमणारा श्रीकृष्ण हा सर्व सामांन्यांच्या विकासाच्या कामात सुद्धा तेवढाच रमताना दिसतो कंस वधाचा प्रतिशोध घेण्यासाठी मगधांच्या सैन्याचे मथुरेवर वारंवार आक्रमणे होत होती. त्या आक्रमणात राज्यासाठी उन्हातान्हात अहोरात्र शेतात घामगाळून ऋषिजनांनी उभ्या केलेल्या पिकाचे नुकसान होत होते. त्यामुळे भविष्यात अन्य धान्याची टंचाई निर्माण झाली असती हे सत्य ओळखून श्रीकृष्णाने यादवामधील नव्या दमाच्या तरूणाचे पथक तयार केले आणि श्रमदानातून यमुना नदीच्या पात्रांतून चर खोदून तो त्याने थेट मथुरेच्या कृषीक्षेत्राला भिडविला. आणि स्वत: नांगर धरून शेती मध्ये पेरणी केली. श्रीकृष्णाने केलेले हे काम म्हणजे एक प्रकारचे युद्धच होते मात्र ते रणांगणावर शत्रुचे निर्दालन करण्यासाठीचे नव्हते तर दैनंदीन जीवनात येणाऱ्या अडचणी सोडण्यिासाठी केलेली ही लढाई होती. कुदळ, खोरे, नांगर इ. अवजारांच्या मदतीने ही लढाई जिंकणारा श्रीकृष्ण म्हणजे अधुनिक काळात शेती विकासासाठी उपयोगात आणलेल्या 'पाट बागायत' ह्या संकल्पनेचा जनकच वाटतो.

तसेच संम्यतक मणिरत्नांच्या निमित्ताने आक्रूराच्या हातून घडलेल्या अक्षम्य अपराधाला सुद्धा विशाल मनाने श्रीकृष्णाने क्षमा केले होते. कारण नव्या गणराज्यातील कुठल्याही माणसाठायीची गुणवत्ता वाया जाऊ द्यायला तो तयार नव्हता.[१००] तसेच अंक्रुराच्या ठायी असणारी गुणवत्ता शत्रुपक्षाला मिळाली असती तर, निश्चित मथुरेचे आणि मथुरावासीयांचे नुकसान झाले असते. म्हणून कदाचित

त्याने अक्रूराला क्षमा केले असावे. कारण राजनीती चौफेर पचविलेला तो खऱ्या अर्थाने राजनीतिज्ञ होता.[१०१] तसेच कंस वधा नंतर कंसाच्या दरबारातील अनेक कुशल मंत्रीगणांना श्रीकृष्णाने स्वत:च्या कारभारात सुध्दा त्याच अदबीने वागविलेले दिसते. यामागे सुध्दा त्याच्या वरीलच शुध्द हेतू आसावा. तसेच कंसाच्या कोषागारातील अन्यायाने बळकावलेली संपत्ती सुध्दा श्रीकृष्णाने ज्याची त्याला सुपूर्द केली होती.

तारुण्य! गगनाला गवसणी घालणाऱ्या विचार अश्वांचा रथ हाकणार! जमेल तितकी भूमी पायाखाली तुडवू बघण्याची इच्छा बाळगणारं समुद्राच उफाळणारं पाणी, बाहेरुन येणारं वरकड पाणी प्रथम बाहेरच फेकून देतं. तसं 'अशक्य' हा शब्दच मनाबाहेर फेकणारं![१०२] अशा तरुणांच्या मुळेच राज्याचा विकास होऊ शकतो. या दूरगामी दृष्टीकोनातून श्रीकृष्णाने वृध्द झालेल्या अमात्य 'विपृथांना' निवृत्त केले व त्यांच्याच अनुभवात तयार झालेल्या सुकृतला अमात्य केले. मात्र राज्याच्या विकासाचा अनुभव असणाऱ्या विपृथांच्या अनुभवांना त्याने मोल दिले. तसेच सुधर्मा सभेतील निम्याहून अधिक वृध्द असणाऱ्या मंत्रिगणांना उचिता असा विश्रांतीचा परामर्श दिला. व त्या जागी नव्या नियुक्त्या केल्या. नवनिर्माणाचा सतत भोक्ता असणाऱ्या श्रीकृष्णाने या ठिकाणी नव्या पिढीच्या कर्तृत्वाला व विक्रमाला प्रोत्साहन आणि प्रेरणा दिलेली दिसते. एकूणच श्रीकृष्णाची प्रत्येक कृती ही संपूर्ण मानव जातीच्या कल्याणाला जाऊन भिडलेली दिसते.

## १४) अजोड धैर्य व संशयरहितता -

आयुष्याच्या प्रंभा पासून ते अखेरच्या क्षणा पर्यंत सर्व सामान्य माणूस ज्याज्या प्रसंगी किंकर्तव्य मूढ होऊ शकतो. अशा कोणत्याही प्रसंगी श्रीकृष्ण न खचता शांतच राहिलेला आहे. कारण त्याचा स्वत:च्या बुध्दिमत्तेवर व शक्तीवर परिपूर्ण विश्वास होता. म्हणून प्रत्येक कार्य त्याने कोणत्याहो प्रकारची शंका मनात न धरता केले होते.

वयाने लहान असून देखील कंसा सारख्या बलाढ्य शत्रुशी लढण्यासाठी श्रीकृष्ण त्याच्या धनुर्यागात सहभागी झाला होता. तर गोकुळात पिसाळलेल्या गर्दभाला, अश्वाला आणि कालिया नावाच्या सर्पाच्या प्रसंगातून सुध्दा त्याच्या ठायी असणाऱ्या अतुल धैर्याची कल्पना येते. तसेच

कालयवनाला वधण्यासाठी श्रीकृषणाने रणांगणातून केलेले पलायन आणि त्या नंतर कालयवनाचा झालेला अंत यातून श्रीकृष्णांचा आत्मविश्वास प्रकट होतो.

श्रीकृष्णाने आपल्या संपूर्ण आयूष्यात कोणत्याही प्रसंगी कोणत्याही व्यक्ती बद्दल संशय घेतलेला दिसत नाही. त्यामुळे त्याच्या आयुष्यात भीती नावाची वस्तुच नसलेली दिसते. श्रीकृष्णाचे संपूर्ण जीवन सदाशांत, ओजस्वी व तेज:प्रतापाने परिपूर्ण होते. त्यामुळे आळस, उदासीनता, किंकर्तव्यमूढता त्याच्या जवळ नव्हती. तसेच त्याने आपल्या आयुष्यातील प्रत्येक कार्य कोणत्याही प्रकारची शंका न घेता श्रध्देने केले आहे. कारण श्रीकृष्णाने आपले आयुष्य स्पष्ट प्रकाशित अशा मार्गावर अत्यंत सरळ पणाने काढले आहे.

पितामह भिष्मांना अथवा गुरुद्रोणाचार्यांना, जयंद्रथाला, कर्णाला वधन्यासाठी श्रीकृष्णाने केलेल्या योजनामधून त्याची संशयरहितता, प्रत्ययास येते. तर कुरुक्षेत्रावरील युध्द समाप्त झाल्यानंतर कौरव माता गांधारी ला भेटणारा व तिने दिलेला शाप अत्यंत नम्रपणे ऐकणारा श्रीकृष्ण म्हणजे शांत व निश्चल चित्तवृत्तीचा आदर्शच असलेला दिसतो. एकूणच कोणावरही आरोप न करणारा व कोणाविषयी ही शंका मनात न धरणाऱ्या श्रीकृष्णाची अजोड धैर्यशीलता व संशयरहितता मोठी होती. असे युगंधराचे सादरीकरण करण्याचा यशस्वी प्रयत्न शिवाजी सावंतांनी केला आहे.

## १५) सार्थ कर्मयोगी –

एकापेक्षा सुंदर गुणांनी युक्त आसणारा श्रीकृष्ण हा सार्थ कर्मयोगी असलेला दिसतो. आयुष्यामध्ये कोणतेही कर्म करीत असताना फळाची अपेक्षा न धरता निस्पृहपणे ते कर्म करणाऱ्या व्यक्तीला कर्मयोगी म्हणतात. श्रीकृष्ण चरित्र देखील ह्या कसोटीला परिपूर्णपणे उतरताना दिसते. स्थितप्रज्ञता आणि निस्वार्थीपणा ह्यावर आधारलेल्या जीवनाची वाटचाल करीत असताना श्रीकृष्णाने आपल्या आयुष्यात कोणत्याही प्रकारची अपेक्षा केलेली दिसत नाही. नात्याने मामा असलेला परंतु अध:पतीत झालेल्या कंसाचा वध करुन मिळवलेल्या मथुरेचा सुध्दा राज्यभिषेक त्याने केला नाही. तर आपल्याच राज्याच्या राजसभेत तो चंदनाच्या आसनावर बसताना दिसतो. कर्माला सतत चिकटुन राहणे, सतत कर्मात गर्क राहणे ही कर्मयोग्याची लक्षणे आहे.

निद्रेतही जीवाला कर्म अढळ आहे. हे अटळ कर्म करण्याची जी चतुराई किंवा कौशल्य आहे. तिलाच कर्मयोग म्हणतात.[१०३] असा कर्मयोग श्रीकृष्णाने समतोल बुध्दिने, स्थितप्रज्ञ वृत्तीने साधलेला दिसतो. त्यामुळे श्रीकृष्णाचे कर्मयोगासारखे उदाहरण संपूर्ण भारतातच नव्हे तर जागतिक इतिहासात सापडणार नाही. ज्याला नाळेचा कर्मयोग म्हणतात तो श्रीकृष्णाच्या रक्तकणांच्या पेशीपेशीत असा ठासून भरला आहे.[१०४]

## १६) आदर्श पुत्र श्रीकृष्ण -

मित्र स्नेहाचे लोकोत्तर आदर्श उभा करणारा श्रीकृष्ण हा आपल्या आयुष्यात आदर्श पुत्र कसा असतो ? याचा आदर्श सुध्दा समाजा समोर उभा करताना दिसतो. श्रीकृष्णाला आयुष्यात नंद आणि वसुदेव हे दोन पिता, यशोदा ही पालक माता त रोहिणी ही सावत्र माता आणि देवकी ही जन्मदाती माता लाभले होते. या प्रत्येकाच्या सहवासात आणि संस्कारात वाढलेला श्रीकृष्ण होता. त्यामुळे तो संस्कारशील युगपुरुष ठरताना दिसतो. प्रत्येक प्रांत:काळी व सायंकाळी आपल्या मातेच्या चरणाला मस्तक भिडवून वंदन करणारा श्रीकृष्ण आपल्या मनातील सर्व भावभावना आपल्या मातेजवळ व्यक्त करताना दिसतो तर विधीयुक्त गोपदीक्ष घेतल्य नंतर गोपनायक श्रीकृष्ण गोकुळातले सर्व लहान-थोर गोप सांभाळण्याचे कर्तव्य व वडीलांची आज्ञा आयुष्यभर जीवाची बाजी लावुन सांभाळताना दिसतो.

कंसाच्या धर्नुयुगात सामिल होण्याच्या निमित्ताने गोकुळ सोडणारा श्रीकृष्ण मात्र परत गोकुळात जात नाही मात्र आपल्या माता पितांची खुशाली तो उध्द्वा करवी जाणुन घेत असतो. यातही त्याचे पुत्रप्रेमच व्यक्त होताना दिसते. कारण नंद आणि यशोदा माता हे केवळ श्रीकृष्ण दर्शन व्हावे एवढीच अंतिम इच्छा धरुन असतात. अशा वेळी जर श्रीकृष्ण त्यांच्या समोर गेला असता तर श्रीकृष्णाला बघताक्षणी त्यांचा अंत झाला असता. यासाठी श्रीकृष्ण उध्द्वाला गोकुळात पाठवून त्याची खुशाली समजुन घेतो. तर कंस वधानंतर श्रीकृष्ण स्थान बध्दतेच्या नावाखाली कारावास भोगणाऱ्या आपल्या जन्मदात्या माता पितांना सोडवून आणतो. आणि विधीवत त्यांचा राज्यभिषेक करतो. वसुदेवांना महाराज व देवकी मातेला महाराणी करतो. मात्र त्यांच्या वृध्दत्वाचा विचार करुन श्रीकृष्ण त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचा ताण पडणार नाही याची दक्षता घेतो. एवढेच नव्हे तर अनेक दृष्टांचे निर्दालन करुन व्दारकाधीश अशी पदवी मिळविणारा श्रीकृष्ण मात्र आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धात सुध्दा

आपल्या माता पितांची सेवा करताना व त्यांचे आयुष्यभर साचून राहिलेले दु:खाचे कढ शांत करताना दिसतो.

एवढेच नव्हे तर आपल्या अंत:कालाची जाणीव झालेला श्रीकृष्ण कोणत्याही प्रकारचा भावनावेग आपल्या मनात न निर्माण करता मातापित्यांच्या कक्षात जाऊन त्यांची सेवा करताना दिसतो.

अशा पुत्रप्रेमाचा आदर्श उभा करण्यात लेखक पूर्ण यशस्वी झाला आहे.

## १७) आदर्श बंधू – श्रीकृष्ण –

श्रीकृष्णाला उचलून घेतले म्हणून यशोदा माते भोवती आकांडतांडव करणारा बलराम या रुसलेल्या बलरामाच्या केसा मधून मायेने हात फिरवून त्याला खळाळ हसायला लावणारा श्रीकृष्ण अथवा गोकुळात वावरत असताना बलरामदादाला अनेक निरुत्तर करणारे प्रश्न विचारणारा श्रीकृष्ण. असे गोकुळातल्या जीवनात बलराम व श्रीकृष्णाचे बंधु प्रेम असलेले दिसते. श्रीकृष्णाच्या जीवनावर अखेर पर्यंत धाक दाखवणारे बलराम ही एकमेव व्यक्ती आहे.

वास्तविक बलराम हा श्रीकृष्णाचा सावत्र बंधू होता. रोहिणी मातेचा तो पुत्र होता. मात्र त्यांच बंधुप्रेम आदर्श होत. म्हणूनच की काय ? एकट्या श्रीकृष्णाला न्यायला आलेल्या अक्रूरांन बरोबर नंद महाराजांनी बलरामाला सुध्दा पाठविलेल दिसत. गोकुळातील बालपण संपवूण मथुरेमधील नव्या जीवनाची सुरवात करताना श्रीकृष्णाचे मला तुझ्या छायेसारख्या सोबतीची नितांत आवश्यकता आहे.[१०५] हे बोल श्रीकृष्णाचे बलरामावरील प्रेम व विश्वास प्रकट करते. श्रीकृष्णाच्या दैनंदिन जीवनात ठळकपणे वावरणारी व्यक्तिरेखा म्हणजे बलराम होय. श्रीकृष्णाच्या निळ्या वर्णाच्या व थोडेसे लुकडे पणाच्या बरोबर उलट बलराम तांबूसगौर व बाळसेदार असलेला आढळतो. शरीर ठेवणीच्या बाबत परस्पर विरुध्द असणाऱ्या या बंधूंमध्ये बलराम चटकन रागावणारा व पटकन राग विसरणारा असलेला सरळ मनाचा होता. याउलट श्रीकृष्ण खट्याळ, उपव्दयापी व चळवल्या स्वभावाचा असलेला दिसतो. अशा या भिन्न स्वभावाच्या बलराम आणि श्रीकृष्णाच्या मध्ये सावत्रपणाची साधी पुसटशी भावना सुध्दा असलेली दिसत नाही.

श्रीकृष्णाच्या बंधू प्रेमाची साक्ष पटते ती कंस वधानंतर मिळविलेले मथूरेचे युवराज पद श्रीकृष्णाने बलरामाकडे दिले या प्रसंगातून या नंतरच्या आयुष्यात श्रीकृष्ण बऱ्याचदा बलरामाच्या आज्ञेत वावरतानाच दिसतो. आणि स्पष्ट वक्त्या भाबड्या स्वभावाच्या बलरामाचा आदर राखलेला दिसतो. याची साक्ष पटते ती सुभद्रेच्या विवाह प्रसंगात सुभद्रेच्या मनाचा कौल लक्षात न तिचा विवाह कौरवांच्या जेष्ठ बंधू दुर्योधनांबरोबर बलरामाने ठरविलेला होता. मात्र अर्जुनाचा आणि सुभद्रेचा प्रेमभाव श्रीकृष्णाला कळाला होता. त्यातच श्रीकृष्णाचे अर्जुनावर निरपेक्ष प्रेम होते. अशा प्रसंगी श्रीकृष्णाने बलरामालातर दुखावले नाही. आणि सुभद्रेच्या मनाविरुध्दही काही घडून दिले नाही. याला कारण म्हणजे त्याच भगीनीवरंच असलेले निस्सीम प्रेम हेही होत. मात्र या प्रसंगात श्रीकृष्णाने बलरामा कुठे सुध्दा अनादर होऊ दिला नाही.

सम्यंतक मण्याच्या प्रकरणात गैरसमजूत करुन घेऊन श्रीकृष्णाला सोडून गेलेल्या बलरामाला परत आणण्यासाठी श्रीकृष्णाने बंद पेटीमध्ये आपल्या मुकूटातील मोरपीस पाठविले होते. जर बलराम परत नाही आला तर मोरपीस परत कधीसुध्दा मुकूटात धारण न करण्याची शपथ श्रीकृष्णाने केली होती. बंधु प्रेमाखातर आपल्या प्रिय वस्तुनां सुध्दा दूर सारणाऱ्या श्रीकृष्णाचे प्रेम निर्विवाद श्रेष्ठ होते. तर यमुनेच्या पात्रातून आपला बंधू कायम स्वरुपी गायब झालेला पाहून आयुष्यात केवळ तीन वेळा डोळ्यात पाणी येणाऱ्या श्रीकृष्णाचे ह्या वेळी सुध्दा युगंधरी अश्रु डोळ्यातून यमुनेच्या तप्त वाळूत पडतात.

बलरामाला मनभरं सौख्य प्राप्त व्हावे म्हणून प्रयत्न करणारा श्रीकृष्णाने त्याच्या वडीलधारीपणाचा तो सावत्रबंधू असूनही पराकोटीचा आदर बाळगला आहे. बलरामाचा मोठेपणा विनम्रपणे आयुष्यभर जपून श्रीकृष्णाने आजपर्यंत अनेकांच्या हृदयात अमर मोठेपणा स्वत:साठी कुशलपणे संपादित केला आहे.

## १८) आदर्श पती – श्रीकृष्ण –

श्रीकृष्णाला आयुष्यात रुक्मिणी, सत्यभामा, जांबवती, कालिंदी, मित्रविंदा, सत्या, लक्ष्मणा व भद्रा अशा अष्टपत्नी लाभल्या आहेत. यातील रुक्मिणी, सत्यभामा आणि जांबवती यांचे प्रसंगानुरुप संदर्भ येतात. बाकीच्या पाच स्त्रियांचे अत्यंत त्रोटक संदर्भ आलेला आहे. तर पहिल्या तीन पत्नीमध्ये रुक्मिणीचे स्थान आगळं होतं. कारण रुक्मिणीने श्रीकृष्णालाा न पाहता केवळ त्याची दिगंत कीर्ती ऐकून

त्याला वरल होतं तर रुक्मिणीच्या आर्त हाकेला धावणाऱ्या श्रीकृष्णाने तिला पत्नी म्हणून स्विकारले होते. तर ऋक्षमान पर्वतावरील जांबवानाची कन्या 'जांबवती' ह्या आदिवासी कन्येचा सुद्धा त्याने पत्नी म्हणून स्विकार केला होता. तसेच सत्राजिता सारख्या धनवान पित्याची सत्यभामा या अहंमान्य क्षत्राणीचा सुध्दा त्याने पत्नी म्हणून स्विकार केला होता. तर उर्वरीत पाच पत्नी त्याने प्रसंगानुरुप वरल्या होत्या. मात्र या अष्टनायिका मध्ये श्रीकृष्णाने कधी सुध्दा श्रेष्ठता कनिष्ठता केलेली दिसत नाही. कारण श्रीकृष्ण हा स्थितप्रज्ञ व विवेकी महापुरुष होता. यामुळे पांडव व द्रौपदीच्या एकांतवासाची वेळापत्रके निश्चित करणारा श्रीकृष्ण सुध्दा आपल्या आयुष्यात तेवढाच काटेकोर असणार हे निश्चित. त्यामुळे श्रीकृष्णाच्या गृहजीवनात कधीही क्लेश अथवा कलह झालेला दिसत नाही.

महायुध्दानंतर मानसिक सन्यस्त स्विकारणाऱ्या श्रीकृष्णाने मात्र आपल्या पत्नींच्या राणी द्वीपावर जाणे येणे हळूहळू कमी केलेले दिसते. मात्र अखेरच्या काही दिवसात श्रीकृष्णाने आपल्या आठही राणींच्या कक्षात समान दिवस व्यतित केलेले होते.

युध्द समाजजीवन आणि गृहजीवन या प्रत्येक ठिकाणी कोणताही कमी अधिक न करता शांतपणे जीवन व्यतित करणारा श्रीकृष्ण सहजच आदर्श पती असलेला दिसतो.

## १९) समर्थ मार्गदर्शक –

आदर्श पुत्र, आदर्श बंधु आणि आदर्श पती असणारा श्रीकृष्ण एक समर्थ मार्गदर्शक सुध्दा असलेला दिसतो. पांडवांना आपला न्याय हक्क मिळावा म्हणून त्यांच्या पाठीशी हिमालयासारखा उभा असणाऱ्या श्रीकृष्णाने पांडवांच्या मार्गदर्शकांची भूमिका लीलया पार पाडलेली दिसते. ही भूमिका पार पाडीत असताना त्याने कधी नाजूक आणि अलवार भूमिका घेतली आहे तर कधी कडक, कठोर व आज्ञार्थी भूमिका घेतलेली आहे. कारण त्याला पांडवांच्या गुणांबरोबरच त्यांच्या दुर्गुणांची सुद्धा जाणीव होती. तसेच कोणत्या प्रसंगी हे पाचबंधू कसे वागतील याची सुध्दा जाणीव होती. तेवढी जाण इतर कुणालाच नव्हती. म्हणूनच श्रीकृष्णाने या पाच बंधुना एकत्र बांधुन ठेवण्यासाठी अप्रतिम सौंदर्यवती द्रौपदीचा वापर केलेला आहे. तर द्रौपदीला पाच पतींचा स्विकार करण्याचे कारण सांगणारा श्रीकृष्णाने पांडवांचा किती बारकाईने अभ्यास केला होता हे लक्षात येते. म्हणुन कुंतीमातेने श्रीकृष्णावर परिपूर्ण

विश्वास ठेवला होता. तसेच द्रौपदी व तिच्या पाचही पतींच्या एकांताची सर्व संहिता श्रीकृष्णाने आखली होती. या वरुनच श्रीकृष्ण हा केवळ सामाजिक व राजकीय जीवनातच पांडवांना मार्गदर्शन करीत नव्हता तर त्यांच्या वैयक्तिक जीवनात सुध्दा त्याचा फार मोठा सहभाग होता हे लक्षात येते.

खांडवनासारखा घनदाट अरण्याचे इंद्रप्रस्था सारख्या विकसीत नगरीत रुपांतर करण्यासाठी श्रीकृष्णाने घेतलेले कष्ट याचेच प्रत्यय देतात. तर पांडवांच्या वनवास व अज्ञात वासाचे संपूर्ण नियोजन करणारा श्रीकृष्ण व कुरुक्षेत्रावर अठरा दिवस चाललेल्या युध्दाच्या सर्व रणनिती आखणारा श्रीकृष्ण व युध्द जिंकल्यानंतर पांडवांच्या भावी राज्य कारभाराची योजना आखणारा श्रीकृष्ण हा जसा पांडवांचा मार्गदर्शक वाटतो. त्यापेक्षा तो पांडवांचा काळजीवाहक वाटतो. कारण पांडवांच्या मनाच्या सर्व मात्रांसह जाणणारा श्रीकृष्ण हा एकमेव होता असे युगंधर मध्ये लेखकाने चित्रीत केलेले आहे.

## २०) कुशल रणनितीज्ञ -

कंस, जरासंध, श्रृगाल, नरकासूर ह्या महापराक्रमी परंतु अन्यायी राजांना आव्हान देऊन त्यांना यमसदनी धाडणारा श्रीकृष्ण जसा पराक्रमी योध्दा होता तसाच तो यशस्वी रणनिती आखणारा कुशल रणनितीज्ञ सुध्दा होता. शत्रुच्या हल्ल्यापासून वाचण्यासाठी द्वारकेची केलेली रचना त्याच्या ह्या कुशलतेचा प्रत्यय देते. एखाद्या अन्यायी राजाचा निष्पात करण्यासाठी श्रीकृष्ण प्रथम त्या त्या राज्यातील नरेश व त्यांचे स्वभाव, तेथील गणलोक राजनगर, प्रमुख योध्दे, समरात त्यांची झुंजण्याची विशिष्ट पद्धत, त्या त्या राज्यातील बोलीभाषा, नद्या, पर्वत, दऱ्या-खोरी, सरोवर याची इत्यंभूत माहिती आपल्या गुप्तचरांच्या मार्फत काढून घेत असत आणि एखाद्या विषयावरची गुप्त चर्चा करायची असेल तर सुधर्मा सभेतील मंत्रीगणासह मोठ्या नौकेतून पश्चिम सागरात जात आणि तिथं एकांती चर्चा, मंत्रणा करत यावरुनच त्याच्या ठायीचे कुशलत्व प्रकटताना दिसते.

श्रीकृष्णाच्या ठायी असणारे रणकुशलत्व अनेकदा सेनापती सात्यकीच्या चर्चेतून प्रकटताना दिसते. युध्दात गज, अश्व आणि उष्ट्र यांचा वापर त्या प्राण्याच्या शारीरिक रचना आणि लकबीनुसार कसा करावा या बद्दलचे श्रीकृष्णाचे विचार म्हणजे रणनितीचा किती बारकाईने अभ्यास केला होता या प्रत्यय देतात. मात्र श्रीकृष्ण खऱ्या अर्थाने रणनितीज्ञ म्हणून उठून दिसतो तो अठरा दिवस चाललेल्या कुरुक्षेत्रावरील महासंग्रातून या युध्दाच्या तिथी निश्चित करण्यापासून ते सेनापती निवडीपर्यंतच्या घटना,

त्याच्या अंगी असणारे तज्ञपण स्पष्ट करते. तर कौरवांची सैन्य रचना आणि हल्ल्याला तोडीस तोड उत्तर देणारा श्रीकृष्ण म्हणजे मूर्तीमंत राजनितीज्ञ असल्याचीच खात्री देते.

## २१) सर्व विद्या पारंगत -

भारतीय इतिहासात एक पूर्ण पुरुष म्हणून ओळखला गेलेला श्रीकृष्ण हा केवळ कुशल राजकारणी अथवा केवळ योध्दा होता असे नव्हे तर तत्कालीन मानव समुहाच्या विकासाला, संरक्षणाला व रंजनाला आवश्यक असणाऱ्या सर्व कला, विद्या त्याने आत्मसात केल्या होत्या. प्रत्येक लहान थोराकडून मिळेल ते कौशल्य उचलण्याची वृत्ती असलेल्या कृष्णदेवाने एरवी कुणालाही असाध्य असलेल्या चौदाही विद्या, चौसष्ट कलांवर परिपूर्ण अधिकार मिळविला होता. तर सामवेदासारखा संगीत त्याच्या भोवती सदैव सप्तसुरात रांजी घालत होते. तसेच अनेक कलात निष्णांत असणाऱ्या आकृतीकांच्या कडून श्रीकृष्णाने मंत्रोचाराच्या द्वारे सर्पदंशाचा प्रभाव नष्ट करणारी गारुड विद्या देखील अवगत केली होती.

अशा अनेक कलाविध गुणांना आत्मसात करणारा श्रीकृष्ण म्हणजे एक असामान्य प्रज्ञावंत असल्याची साक्ष पटते.

## २२) कुशल राजकारणी श्रीकृष्ण -

श्रीकृष्ण चरित्रातील एक महत्वपूर्ण गुण म्हणजे तो राजकारणी होता. परंतु आजपर्यंतच्या प्रत्येक साहित्यिकाने त्याला कुटील राजकारणी म्हणूनच वाचकांच्या समोर उभा केला. मात्र शिवाजी सावंतांनी श्रीकृष्णाला एक कुशल राजकारणी म्हणून युगंधर मध्ये साकार केलेला आहे. राजकारणी माणसाचं मन हे घुशीच्या बिळासारखं असावं हे बीळ तसं कुठून सुरु होतं आणि कुठं जातं हे कुणालाच कळत नाही. त्याचप्रमाणे श्रीकृष्णाच्या मनात काय चालले आहे हे कधीच कळत नव्हते आणि ते दुसऱ्याला समजावून देण्याच्या भानगडीतही श्रीकृष्ण कधी पडत नव्हता. कारण राजकारण म्हणजे खुल्या मनाने चर्चा करावी असा मंदिरातला प्रवचनाचा विषय नव्हता. अथवा नसतो याची त्याला परिपूर्ण जाण होती. म्हणून तर त्याने अनेक प्रसंगात आपल्या अजोड बुध्दी कौशल्याची चमक दाखवून अनेक दुर्धर प्रसंग लीलया हाताळलेले दिसतात.

त्यामध्ये भीष्मासारख्या महापराक्रमी कुरुला आवरण्यासाठी व पांडवांचा जीव वाचविण्यासाठी भीष्मांच्याच वृध्दत्वाचा आणि त्यांच्या तेजस्वी, सत्यवचनीपणाचा फायदा उठविणारा श्रीकृष्ण दिसतो. तर कर्णासारख्या महारथीला आवरण्यासाठी कुंतीकडून त्याला त्याच्या जन्माचे रहस्य कळविणारा श्रीकृष्ण म्हणजे काळाचा व वेळेचा अचूक फायदा उठविणारा राजकारणी दिसतो.

एवढेच नव्हे तर दुर्योधनाच्या आग्रहाने जर कर्णाला कौरवांचे सेनापती पद देण्यात आले तर कौरवांच्या अत्यंत शिस्तबध्द असणाऱ्या सैन्यासमोर व महापराक्रमी कर्णासमोर पांडवांचा पाडावा लागणे शक्य नसल्याचे ओळखून भीष्मांचा अहंकारी स्वभाव डिवचणारा श्रीकृष्ण कर्ण व भीष्मांच्यात वैरत्व निर्माण करतो. तर अर्जुनाचे सारथ्य करताना अर्जुनाच्या नंदिघोष रथाला स्वतःच्या गरुड ध्वजाचे शैल्य, बलाहक, मेघ, पुष्प आणि सुग्रीव हे अश्व जुंपायला लावतो. कारण श्रीकृष्णाचा असलेला सराव.

भल्याभल्यांना तपातपांची साधना करुनही सहज साध्य होणार नाही असे अद्‌भूत बुध्दिवैभव श्रीकृष्णाने अनेक बारीक सारीक प्रसंगातून सिध्द केलेले आहे.

## २३) जीवनाकडे एक कर्मयोग यज्ञ म्हणून तटस्थतेने पाहणारा श्रीकृष्ण –

बंदिस्त पणात जन्म घेऊन विमुक्तपणा मध्ये जीवन समाप्त करणारा श्रीकृष्णाने वैश्विक तत्वज्ञानातील अत्युच्च अविष्कार म्हणून पिढ्यान् पिढ्या श्रेष्ठ ठरलेली 'गीते' द्वारे जरी कर्मयोगाची महती गायिली असली तरी आजपर्यंत सर्व अभ्यासकांनी त्याच्या प्रत्येक पायठशाबरोबर जी अनुभव गीता उमटली गेली तिच्याकडं पूर्णपणे दुर्लक्ष केलेले दिसते. आपल्या जीवनाच्या प्रत्येक प्रसंगात येणारं जीवनाचं रास्त कर्तव्य कोणतं? जीवन म्हणजे काय ? कर्मयोगातून येणार जीवनाचं रास्त कर्तव्य कोणतं ? आणि रास्त जीवनप्रणाली म्हणजे काय ? हे शिकविणारा श्रीकृष्णही युगंधर मधील एकमेव व्यक्तिरेखा दिसते. श्रीकृष्णाने आपल्या जीवनाकडे एक कर्मयोग यज्ञ म्हणून तटस्थपणे पाहिलेले दिसते. त्यामुळेच त्याने आपल्या जीवनातून परमावधीची आसक्ती आणि पराकोटीची विरक्ती साधलेली आहे. त्यामुळे केवळ अध्यात्मिकच नव्हे तर सामाजिक, नैतिक अथवा अन्य कोणत्याही दृष्टीने पाहिले तर श्रीकृष्णाच्या बरोबरीला उतरेल असा राजनितीज्ञ पहायला मिळणार नाही. म्हणूनच श्रीकृष्ण ही एक परिपूर्ण व्यक्तिरेखा असल्याचे युगंधर मध्ये स्पष्ट होते.

प्रत्येक प्रसंगात निर्विवाद आणि संपूर्ण यश मिळविणाऱ्या श्रीकृष्णाने आपल्या स्वभावातील नम्रता आणि ऋजुता जशी कधी सुध्दा त्यागलेली दिसत नाही. त्याचप्रमाणे त्याने आपल्या जीवनात कधीसुध्दा स्वार्थ बुध्दिला प्रबळ होऊन दिले नाही. म्हूणन तर युगंधर श्रीकृष्णाने स्वत:हून चुकून कधीही केल्या विक्रमाचा निर्देश कुठच केलेला दिसत नाही. उलट प्रत्येक प्रसंगातील कर्म व यश त्याने पराकोटीच्या अबोलपणाने स्विकारलेले दिसते. श्रीकृष्णाच्या जीवन संघर्षात 'स्त्री' हे निसर्ग तत्व अत्यंत नाट्यमय पध्दतीने क्रमश: येत गेलं आहे. मात्र प्रत्येक ठिकाणी तो आपल्या जाणत्या व प्रगल्भ अशा वृत्तीने वागला आहे. त्याने सत्य आणि असत्याच्या युध्दात नेहमी सत्याचीच पाठराखण केली आहे व असत्याचा बिमोड केला आहे. त्यामुळे तो इतर जणांपेक्षा पूर्णपणे वेगळा दिसतो.

ठायी ठायी अडखळणारं, तुंबलेलं मानवी जीवन मुक्त करणाऱ्या श्रीकृष्णाने आपल्या जिवीत कार्याचे स्पष्ट पायठसे उमटवीले आहेत की ज्या युगायुगांच्या पिढ्यांना त्यावर विचार करुन मार्गक्रमण करता येऊ शकते. अशा श्रीकृष्णाने आपल्या अंतिम समयी सारथ्याचा वेष परिधान केला होता. त्याच्या ह्या कृतीवरुनच श्रीकृष्ण म्हणजे कर्मयोगाचा वेद असलेला कळतो. कारण मृत्युनंतरच्या आयुष्याचे जणू आता तो सारथ्य करायला निघाला असावा असे दिसतो. म्हणून तर श्रीकृष्ण म्हणजे भारतीयांसाठी अनेकविध मूक मार्गानी 'उत्तिष्ठ कृतनिश्चय' असं युगानुयुगे म्हणत आलेला एकमेव प्रेरणास्त्रोत आहे. दीपस्तंभवत युगंधरी प्रेरणास्त्रोत आहे.[१०६] एकूणच जीवनाकडे एक कर्मयोग यज्ञ म्हणून तटस्थपणे पाहणारा श्रीकृष्ण म्हणजे समाज घडविणारा योजक निर्माता म्हणून पूर्णपणे यशस्वी झाला आहे. म्हणूनच तो पूर्णपणे यशस्वी व परिपूर्ण व्यक्ति असलेला युगंधर मध्ये दिसतो.

### २४) आपण कोण आहोत, हे माहिती असणारा जगाआगळा युगंधर –

श्रीकृष्णाला आजपर्यंत प्रत्येकाने त्याच्या प्रत्येक कृतीतून ज्यानं त्यानं आपल्या क्षमतेप्रमाणे जाणून घेतले, समजून घेतले. युगंधर मध्ये लेखकाने श्रीकृष्णाला चमत्कारांच्या आंगड्या टोपड्यातून बाहेर काढून वासुदेवत्वाप्रत पोहचलेला मानव देहधारी युगंधर रुपात प्रकट केले खरं मात्र 'अहमात्मा गुडाकेश सर्वभूताशयस्थित:'[१०७] असे वचन सांगण्याऱ्या श्रीकृष्णाचे देवत्व मात्र पूर्णपणे नाकारु शकले नाहीत. कारण युगंधर मधील प्रत्येक व्यक्तिरेखा ही 'मी कोण आहे ?' याच मूलभूत प्रश्नांच्या उत्तराच्या

शोधात असलेली दिसते. एकटी श्रीकृष्ण ही 'मी कोण आहे ?' हे सर्वांगानी जन्माबरोबरच स्पष्ट जाणलेली व तसंच जीवनभर वागलेली एकमेव व्यक्तिरेखा दिसते. त्यामुळेच ती प्रत्येकाला वेगळी वाटते. श्रीकृष्णाला आपण कोण आहेत हे पूर्णपणे माहित असल्या कारणानेच कदाचित त्याच्या व्यक्तिमत्वातील इतर गुणवैशिष्ट्य अथवा पैलू अधिक उजळून निघालेले दिसतात.

कुरुक्षेत्रावरील युध्दाच्या पहिल्याच दिवशी आप्तगणांना शत्रुच्या सैन्यात पाहून योग्य काय ? अयोग्य काय ? धर्म कोणता ? अधर्म कोणता ? या भयाण संक्रमणात पडलेल्या अर्जुनाला पुन्हा प्रेरणा देण्यासाठी श्रीकृष्णाने जी प्रेरक तत्वे सांगितली आहेत. त्या तत्वांमुळे श्रीकृष्ण हा तत्वज्ञ ठरला खरा मात्र ही तत्व त्याच्या युगंधरी जीवनातून प्रकटलेली दिसतात.

श्रीकृष्णाच्या भाव विश्वात स्थान असणाऱ्या प्रत्येक व्यक्तिला श्रीकृष्ण खरा कोण आहे ? असा अनेक ठिकाणी प्रश्न पडलेला दिसतो. परंतु त्या प्रश्नाचे तो कधीही उत्तर देत नाही. मात्र आपल्या प्राणप्रिय अर्जुनाला उत्साहीत करण्यासाठी मात्र श्रीकृष्ण 'को ऽ हम' या प्रत्येक मानवाला पडलेल्या प्रश्नाचे उत्तर अत्यंत व्यापक परिमानातून देताना दिसतो आणि ह्याच ठिकाणी त्याचे देवत्व प्रकटते आणि प्रत्येक चराचरात मीच आहे. असे सांगणारा श्रीकृष्ण आपले योगयोगेश्वर रुप अर्जुना समोर प्रकट करतो. चरा-चरातील सर्व निवडक वस्तुंच्या रुपात 'मी' आहे. असं जागतिक धार्मिक, तात्विक, वैचारीक सर्व प्रकारांत, सर्व भाषांमध्ये म्हणणारा एकमेव श्रीकृष्ण आहे. त्यामुळे ह्यापूर्वी सुध्दा मी होतो आणि या नंतरही मी अनेक जन्म घेणार आहे. असे अद्‌भूत वचन देणाऱ्या श्रीकृष्णाचे युगंधरी रुप वाचकांच्या अंर्तमनाला सुर्यकिरणा इतके स्पष्ट स्पर्शून जाताना दिसते.

एकंदर संपन्न व्यक्तिमत्वाचा श्रीकृष्ण हा युगंधर मध्ये एक पूर्णपुरुष म्हणून साकार करण्यात लेखकाने यश मिळविले आहे. त्याचसोबत या युगंधराच्या अंगी असणारे धीरोदात्तता, संयशरहितता, औदार्य व संस्कारशीलता ह्या एकापेक्षा एक महान गुणांना सुध्दा त्यांनी प्रभावीपणे वाचकांच्या समोर आणले आहे. त्यामुळे मुळ संहितेतील श्रीकृष्ण चरित्रातील चमत्कारांनी बुध्दिपुरस्सर बाजूला सारुन त्याला एक पूर्ण पुरुष म्हणून वाचकांच्या समोर लालित्यपूर्ण रितीने व रसाळ भाषेत मांडण्याचा लेखकाचा जो उद्देश आहे तो बऱ्याच अंशी सफल झालेला दिसतो.

युगंधर ही कादंबरी नायक प्रधान आहे. हा नायक हिंदू धर्माचा उद्गाता, तत्ववेत्ता, त्राता श्रीकृष्ण आहे. तरीही अवतारी व्यक्तीची शोकांतिकाच असते. हे सत्य अधोरेखीतच करणारे हे चरित्र आहे. मात्र सर्व सद्गुणांच्या समुच्चयाचे देवत्व युगंधराच्या व्यक्तिमत्वात घोषित न करता शिवाजी सावंतांना श्रीकृष्ण या अवतारी पूर्णरुपास 'अंतर्बाह्य' मानवी साज चढविण्याचा प्रयत्न केलेला आहे. मात्र तो पूर्णत: यशस्वी झाला असे मात्र म्हणता येत नाही. पुराणाला वास्तवाचे रंग देताना आणि देवत्वाचा साज व बाज युगानुयुगे चढवलेल्या श्रीकृष्णाचे मानवीकरण करताना लेखनाची स्वाभाविकता काही ठिकाणी हरवलेली आढळते.

## संदर्भ


| | | | |
|---|---|---|---|
| १) | मृत्युंजय | : | दै. मराठा अग्रलेख,<br>संपादक-आचार्य प्र. के. अत्रे.<br>दिनांक- ४ ऑगस्ट १९६८ |
| २) | मृत्युंजय | : | लेखक- शिवाजी सावंत,<br>प्रकाशन- कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे,<br>आवृत्ती- प्रथम, पुर्नमुद्रन- २००२. |
| ३) | तत्रैव | : | पृ. ४ |
| ४) | तत्रैव | : | पृ. ५ |
| ५) | तत्रैव | : | पृ. ५ |
| ६) | तत्रैव | : | पृ. २२ |
| ७) | तत्रैव | : | पृ. ३४ |
| ८) | तत्रैव | : | पृ. ४५७ |
| ९) | कर्ण खरा कोण होता ? | : | लेखक- दाजी पणशीकर,<br>प्रकाशन- रविराज प्रकाशन, पुणे,<br>आव्रृत्ती- आठवी, १९९९, पृ. १६३ |
| १०) | मृत्युंजय | : | लेखक- शिवाजी सावंत,<br>प्रकाशन- कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे,<br>आकृती- प्रथम, पुर्नमुद्रण-२००२,पृ. ७ |
| ११) | कर्ण खरा कोण होता? | : | लेखक- दाजी पणशीकर,<br>प्रकाशन- रविराज प्रकाशन, पुणे.<br>आवृत्ती- आठवी, १९९९, पृ. ४३. |

| | | | |
|---|---|---|---|
| १२) | मृत्युंजय | : | लेखक- शिवाजी सावंत,<br>प्रकाशन- कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.<br>आवृत्ती प्रथच, पुर्नमुद्रण-२००२,पृ.६१५. |
| १३) | तत्रैव | : | पृ. ५०९ |
| १४) | तत्रैव | : | पृ. ५०९ |
| १५) | तत्रैव | : | पृ. २९ |
| १६) | तत्रैव | : | पृ. ७६ |
| १७) | तत्रैव | : | पृ. २२३ |
| १८) | तत्रैव | : | पृ. ४६६ |
| १९) | तत्रैव | : | पृ. ४७२ |
| २०) | तत्रैव | : | पृ. ४७२ |
| २१) | तत्रैव | : | पृ. ४७३ |
| २२) | मृत्युंजय | : | लेखक- शिवाजी सावंत,<br>प्रकाशन- कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे,<br>आवृती- प्रथम, पुर्नमुद्रण-२००२,पृ.५७१ |
| २३) | तत्रैव | : | पृ. ५५२ |
| २४) | तत्रैव | : | पृ. ६०७ |
| २५) | कर्ण खरा कोण होता ? | : | लेखक- दाजी पणशोकर,<br>प्रकाशन- रविराज प्रकाशन, पुणे.<br>आवृत्ती- आठवी, १९९९. पृ. १६२. |
| २६) | मृत्युंजय | : | लेखक- शिवाजी सावंत,<br>प्रकाशन- कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. |

आवृत्ती- प्रथम, पुर्नमुद्रण-२००२,पृ.४५८.

२७) तत्रैव : पृ. ५७१

२८) तत्रैव : पृ. ६१६

२९) तत्रैव : पृ. ५९४

३०) तत्रैव : पृ. ३१८

३१) तत्रैव : पृ. ३०६

३२) तत्रैव : पृ. १९१

३३) तत्रैव : पृ. २९९

३४) तत्रैव : पृ. ५१०

३५) तत्रैव : पृ. ८४

३६) तत्रैव : पृ. ४६७

३७) मृत्यंजय : दै. मराठा अग्रलेख,
संपादक- आचार्य. प्र. के. अत्रे.
दि. ४ ऑगस्ट १९६८.

३८) मृत्युंजय : लेखक- शिवाजी सावंत,
प्रकाशन- कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.
आवृत्ती- प्रथम, पुर्नमुद्रण-२००२
पृ. ३०३

३९) तत्रैव : पृ. ३०५

४०) तत्रैव : पृ. ५११

४१) तत्रैव : पृ. ८२

४२) छावा : लेखक- शिवाजी सावंत,
प्रकाशन- कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.
आवृत्ती- प्रथम- १९७९, पृ. ४८१

४३) तत्रैव : पृ. ४८७

४४) मृत्युंजयकार शिवाजी सावंत.
व्यक्ती आणि साहित्य : संपादक- शांताराम वाघ.
प्रकाशन- शशीदीप प्रकाशन, पुणे.
आवृती- प्रथम, १ जानेवारी २००१
पृ. ५२

४५) शिवपुत्र संभाजी : लेखक- कै. डॉ. प्रा. सौ. कमल गोखले,
प्रकाशन- कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.
आवृत्ती- चौथी, २००१
चरित्राची वाटचाल.

४६) छावा : लेखक- शिवाजी सावंत.
प्रकाशन- कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.
आवृत्ती- प्रथम, १९७९. पृ. ६०

४७) मृत्युंजय : लेखक- शिवाजी सावंत.
प्रकाशन- कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.
आवृत्ती- प्रथम, पुर्नमुद्रण- २००२
पृ. ४१३

४८) छावा : लेखक- शिवाजी सावंत.

प्रकाशन- कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

आवृती- प्रथम, १९७९. पृ. १३५.

४९) तत्रैव : पृ. ३७५

५०) शिवपुत्र संभाजी : लेखक- कै . प्रा. डॉ. सौ. कमल गोखले,

प्रकाशन- कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

आवृत्ती- चौथी, २००१ पृ. ३३६.

५१) छावा : लेखक- शिवाजी सावंत.

प्रकाशन- कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

आवृत्ती- प्रथम, १९७९, पृ. ४५१

५२) तत्रैव : पृ. १६७

५३) तत्रैव : पृ. १०१, १०२

५४) तत्रैव : पृ. ३१७

५५) श्री मच्छंभुनृपविरचितम्

बुधभूषणम (संस्कृत-इंग्लिश) : संपादक- एच. डी. वलणकर.

प्रकाशन- भांडारकर प्राच्य विधा संशाधन केंद्र, पुणे.

Government oriental series,

class- 3, No- 2, 1926. पृ. २.

५६) छावा : लेखक- शिवाजी सावंत,

प्रकाशन- कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

आवृत्ती- प्रथम, १९७९. पृ. ३७३.

५७) तत्रैव : पृ.६७

५८) तत्रैव : पृ. १३०,३३१.

५९) तत्रैव : पृ. ३१०

६०) शिवपुत्र संभाजी : लेखक-कै डॉ. प्रा. सौ. कमल गोखले,
प्रकाशन- कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.
आवृत्ती- चौथी, २००१, पृ. ४३४

६१) छावा : लेखक- शिवाजी सावंत,
प्रकाशन- कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.
आवृत्ती- प्रथम, १९७९. पृ. ४६९.

६२) मराठ्यांचा इतिहास : लेखक- डॉ. सोमनाथ रोडे.
प्रकाशन- पिंपळापुरे ॲण्ड कं .
पब्लिकेशर्स, नागपूर.
आवृत्ती- प्रथम,जून १९९८,पृ. २२४

६३) छावा : लेखक- शिवाजी सावंत,
प्रकाशन- कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.
आवृत्ती- प्रथम, १९७९.पृ. ७५५

६४) मल्हार रामराव चिटणीस विरचित. श्रीमंत छत्रपती संभाजी महाराज यांचे चरित्र (मराठी) : संपादक- का. ना. साने,
आवृत्ती- ३ री, १९१५, पुणे.
पृ. ९.

६५) छावा : लेखक- शिवाजी सावंत,

| | | | |
|---|---|---|---|
| | | | प्रकाशन- कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.<br>आवृत्ती- प्रथम, १९७९. पृ. २७४ |
| ६६) | तत्रैव | : | पृ. ७३. |
| ६७) | तत्रैव | : | पृ. ३८६. |
| ६८) | शिवपुत्र संभाजी | : | लेखक-कै डॉ. प्रा. सौ. कमल गोखले,<br>प्रकाशन- कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.<br>आवृत्ती- चौथी, २००१ पृ. ३४५ |
| ६९) | छावा | : | लेखक- शिवाजी सावंत,<br>प्रकाशन- कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.<br>आवृत्ती- प्रथम, १९७९. पृ. ६१० |
| ७०) | तत्रैव | : | पृ. २५८ |
| ७१) | तत्रैव | : | पृ. ३७५ |
| ७२) | तत्रैव | : | पृ. ६०९ |
| ७३) | तत्रैव | : | पृ. ६०९ |
| ७४) | मराठ्यांचा इतिहास | : | लेखक- डॉ. सोमनाथ रोडे<br>प्रकाशन- पिंपळापुरे ॲण्ड कं .<br>पब्लिकेशर्स नागपूर.<br>आवृत्ती- प्रथम, जून १९९८,पृ. २१० |
| ७५) | छावा | : | लेखक- शिवाजी सावंत,<br>प्रकाशन- कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.<br>आवृत्ती- प्रथम, १९७९. पृ. ७३९ |

७६) तत्रैव : पृ. २८९

७७) मराठ्यांचा इतिहास (१६००-१८१८) : लेखक- डॉ. रा. गो. कोलारकर, प्रकाशन- श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, आवृत्ती- तृतीय, १९९२. पृ. १७३

७८) युगंधर : लेखक- शिवाजी सावंत, प्रकाशन- कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. आवृत्ती- चौथी, २००५. आचमन.

७९) तत्रैव : पृ. ९

८०) तत्रैव : पृ. १०

८१) मृत्युंजय : लेखक- शिवाजी सावंत, प्रकाशन- कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. आवृत्ती-प्रथम, पुर्नमुद्रण- २००२ पृ. १८२.

८२) तत्रैव : पृ. १७६

८३) युगंधर : लेखक- शिवाजी सावंत, प्रकाशन- कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. आवृत्ती- चौथी, २००५. पृ. २३०

८४) तत्रैव : आचमन

८५) तत्रैव : आचमन

८६) तत्रैव : आचमन

८७) युगंधर श्रीकृष्ण : एक चिंतन : लेखक- शिवाजी सावंत. प्रकाशन- मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

आवृत्ती-प्रथम,फेब्रुबारी- १९९७ पृ. ६९

८८) युगंधर : लेखक- शिवाजी सावंत,

प्रकाशन- कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

आवृत्ती-चौथी, २००५.पृ. १३,१४.

८९) तत्रैव : पृ. ५०

९०) युगंधर श्रीकृष्ण : एक चिंतन : लेखक- शिवाजी सावंत.

प्रकाशन- मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

आवृत्ती- प्रथम, फेब्रुबारी- १९९७

पृ. ६९

९१) तत्रैव : पृ. ७०

९२) तत्रैव : पृ. ६९

९३) युगंधर : लेखक- शिवाजी सावंत,

प्रकाशन- कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

आवृत्ती चौथी, २००५. आचमन.

९४) तत्रैव : पृ. ४८१

९५) तत्रैव : पृ. ४०४

९६) तत्रैव : पृ. ९२०

९७) तत्रैव : पृ. ३२८

९८) तत्रैव : पृ. ६००

९९) तत्रैव : पृ. ६९९, ७००

१००) तत्रैव : पृ. ६८५

१०१) तत्रैव : पृ. ६८५

| | | |
|---|---|---|
| १०२) तत्रैव | : | पृ. ५१ |
| १०३) तत्रैव | : | पृ. ६५१ |
| १०४) युगंधर श्रीकृष्ण : एक चिंतन | : | लेखक- शिवाजी सावंत.<br>प्रकाशन- मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.<br>आवृत्ती- प्रथम, फेब्रुबारी- १९९७<br>प्रस्तावना. |
| १०५) युगंधर | : | लेखक- शिवाजी सावंत,<br>प्रकाशन- कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.<br>आवृत्ती चौथी, २००५. पृ. ५६ |
| १०६) युगंधर श्रीकृष्ण : एक चिंतन | : | लेखक- शिवाजी सावंत.<br>प्रकाशन- मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.<br>आवृत्ती-प्रथम,फेब्रुबारी- १९९७, पृ. ९०. |
| १०७) भगवद्‌गीता (मराठी अनुवाद) | : | अध्याय- १०. |